७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. २७ जून २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १८२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये

# युवकांच्या शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगारासाठी शासन कटिबद्ध

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : मराठा समाजातील युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी सारथीचे उल्लेखनीय कार्य

पुणे (दै. संध्या)

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी शिक्षण, कौशल्य विकास, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, उद्योजकता आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित संधी उपलब्ध करून देण्याचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले असून, या उद्दिष्टासाठी स्थापन झालेल्या सारथी संस्थेच्या माध्यमातून झालेले कार्य उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणेच्यावतीने गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित संघ लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांच्या सन्मान सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, मनपा आयुक्त नवलकिशोर राम, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, नियोजन विभागाच्या सचिव शैला ए, विभागीय आयुक्त शीतल तेली उगले, सारथीचे अध्यक्ष अजित निंबाळकर, व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, सारथीच्या माध्यमातून आतापर्यंत केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात येणाऱ्या परिक्षेत १४०, महाराष्ट्र लोकसेवा आयोग १ हजार १२४ आणि बँकिंग क्षेत्रात ५०० हून अधिक तरुण-तरुणी यशस्वी झाले आहेत. विविध कौशल्य विकास प्रशिक्षणांतून १३ हजारांहून अधिक युवक रोजगारक्षम झाले असून दोन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना विविध प्रशिक्षणांचा लाभ मिळाला आहे.मराठा समाजातील आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागे राहिलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार या तीन पैलूंवर आधारित धोरण राबविण्यात आले.

स्पर्धा परीक्षांमध्ये गुणवत्तेने पात्र ठरूनही जागा कमी असल्यामुळे नोकरी न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'निपुण सेतू' उपक्रम सुरू करण्यात येणार असून अशा विद्यार्थ्यांना खाजगी क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल आणि त्यांच्या प्रशिक्षणाचा खर्च राज्य शासन उचलणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सारथी आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची कार्यालये एकत्र आणून विद्यार्थ्यांना आणि युवकांना एकाच ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचा विचार असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

उच्च शिक्षण क्षेत्रात व्यावसायिक शिक्षणासाठी मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शैक्षणिक शुल्कात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. मोठ्या शहरात होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी वासतिगृह आणि भाऊसाहेब पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना सुरू करण्यात आली आणि विद्यार्थ्यांना ६० हजार रुपयापर्यंत आर्थिक सहकार्य करण्यास सुरुवात झाली. उद्योजकता विकासासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ गतिमान करण्यात आले आणि व्याज सवलत सुरू करण्यात आली. या माध्यमातून पाऊणे दोन लाखापेक्षा अधिक उद्योजक तयार झाले असून साडेसात हजार कोटी रुपयांहून अधिक कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. यासाठी शासन वर्षाला १५०० कोटी देते असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री म्हणाले, मराठा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी पोहोचविण्यासाठी सारथी संस्थेची स्थापना करण्यात आली. स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाबरोबरच संशोधन, पीएच. डी., कौशल्य विकास, रोजगाराभिमुख प्रशिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानातील कौशल्य विकसित करण्यासाठी सारथीने प्रभावी काम केले आहे. आज केवळ प्रशासकीय सेवाच नव्हे, तर खासगी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता , संगणक तंत्रज्ञान, भाषा प्रयोगशाळा, टूल लॅब, ड्रोन तंत्रज्ञान यांसारख्या आधुनिक कौशल्यांकडे वळावे, असे आवाहन त्यांनी केले. शेती क्षेत्रातही राज्य शासनाने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'महाविस्तार' ॲप सुरू केले असून सुमारे ५० लाख शेतकरी त्याचा वापर करत आहेत. ड्रोन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीत मोठे परिवर्तन होणार असून त्यासाठी आवश्यक ड्रोन पायलट प्रशिक्षणही सारथीमार्फत सुरू करण्यात आल्याचेही श्री.फडणवीस यांनी सांगितले. नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, लातूर आणि कोल्हापूर येथे सारथीची विभागीय केंद्रे, विद्यार्थी वसतिगृहे आणि प्रशिक्षण सुविधा उभारण्याचे काम सुरू असून पुढील वर्षभरात ही कामे पूर्ण होतील, अशी माहिती त्यांनी दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थमंत्री असताना सारथीला आवश्यक निधी उपलब्ध करून दिला तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही निधीची कमतरता भासू दिली नाही. त्यामुळे सारथी आज सक्षम संस्थेच्या रूपात उभी राहिली असून त्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. एमपीएससी परीक्षा वेळेत, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने घेण्यावर शासनाचा भर आहे. परीक्षांमध्ये ऑनलाईन पद्धतीबाबत विद्यार्थ्यांशी सविस्तर चर्चा करूनच निर्णय घेतला जाईल. कोणताही निर्णय विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊनच होईल, अशी ग्वाही श्री.फडणवीस यांनी दिली.

## आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केल्यास 'जेल भरो': रोहित पवारांचा इशारा

हिंगोली (दै. संध्या)



जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला दडपण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला चोख प्रत्युत्तर दिले जाईल असा इशारा आमदार रोहित पवार (राष्ट्रवादी शरद पवार गट) त्यांनी दिला आहे. हिंगोली येथील राष्ट्रवादी भवनात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, शेतकरी व सर्व सामान्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलन उभारले जात आहे. आंदोलनाला लोकांचा मिळणारा प्रतिसाद पाहून सरकारकडून पोलिसांचा वापर करून अडथळा निर्माण केला जाण्याची शक्यता आहे. जर पोलिसांनी आंदोलनाला रोखण्याचा प्रयत्न केला, तर रास्ता रोको आंदोलनाचे रूपांतर जेल भरो आंदोलनात केले जाईल असे त्यांनी स्पष्ट केले. हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलताना पवार म्हणाले की, गेल्या वर्षी जिल्ह्यात साडेचार लाख हेक्टरवर पिकांचे नुकसान झाले होते. यासाठी शासनाकडून १२०० कोटी रुपयांची मदत मिळणे अपेक्षित होते, मात्र ती अद्याप मिळालेली नाही. जिल्ह्यातील बहुतांश आमदार सत्ताधारी महायुतीचे असतानाही त्यांना जनतेसाठी हक्काचा निधी मिळवून देता आला नाही, यावरून सत्तेत राहून ते भजी तळत होते का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. विकास करण्यासाठी आम्ही सत्ताधाऱ्यांसोबत गेलो असे सांगणाऱ्या खासदारांवरही त्यांनी सडकून टीका केली. डीलिमिटेशन कायदा पास करण्यासाठी या खासदारांना सामावून घेण्यात आले असून, त्यांना ६० कोटी ते ९० कोटी रुपयांपर्यंतचा निधी वैयक्तिक रोख स्वरूपात दिल्याचा गंभीर आरोप रोहित पवार यांनी केला आहे. या पैशातून केवळ लोकप्रतिनिधींच्या कुटुंबाचा आणि नातेवाईकांचा फायदा झाला असून सर्वसामान्यांच्या पदरी निराशाच पडली आहे असे ते म्हणाले.

## लोहगड हत्या प्रकरण : खटला जलदगती न्यायालयात चालणार

पुणे (दै. संध्या)

राज्यभरात खळबळ उडवून देणाऱ्या पुण्याच्या लोहगड हत्या प्रकरणाने पुरुषांवरील अत्याचाराची एक अतिशय गंभीर बाजू समाजासमोर आणली आहे. स्वतःच्याच होणाऱ्या नवऱ्याला (केतन अग्रवाल) आपल्या प्रियकराच्या मदतीने कट रचून निर्दयीपणे संपवल्याचा धक्कादायक प्रकार यात उघडकीस आला आहे. या भीषण गुन्ह्याप्रकरणी पुणे पोलिसांनी मुख्य आरोपी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन या दोघांनाही बेड्या ठोकल्या असून, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला आहे.

या प्रकरणाची पुणे पोलिसांकडून अत्यंत कसून चौकशी सुरू असून, दररोज नवनवीन आणि धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी आता आपला मोर्चा सियाच्या कुटुंबाकडे वळवला असून, सियाच्या भावालाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. तर दुसरीकडे, आपला मुलगा गमावलेल्या केतन अग्रवालच्या कुटुंबीयांनी न्यायाच्या आशेने थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेत त्यांना साकडे घातले आहे.



### ॲड. उज्ज्वल निकमांची एंट्री; सिया केतनच्या अडचणीत वाढ

लोहगड येथे घडलेल्या केतन अग्रवाल यांच्या दुर्दैवी हत्या प्रकरणी, त्यांचे वडील विशाल अग्रवाल यांनी आज पुण्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत आपल्या मुलाला न्याय मिळवून देण्याची मागणी केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी अग्रवाल कुटुंबीयांचे सांत्वन करत, त्यांना न्याय देण्यासाठी सरकारकडून कोणतीही कसूर सोडली जाणार नाही आणि या प्रकरणातील दोषींना अत्यंत कठोर शिक्षा व्हावी यासाठी आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत, असे भक्कम आश्वासन दिले.

अग्रवाल कुटुंबीयांनी या खटल्यासाठी जलदगती न्यायालयाची स्थापना आणि विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची केलेली मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ मान्य केली आहे. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी विधी व न्याय विभागाच्या सचिवांना तातडीने आवश्यक ते निर्देश दिले असून, स्वतः ॲड. उज्ज्वल निकम यांनीही या न्यायदानाच्या प्रक्रियेत विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहण्यास आपली संमती दर्शवली आहे.

दरम्यान, मृत केतनचे वडील विशाल अग्रवाल यांनी मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर माध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, सियाचा भाऊ साहिल आणि तिचा प्रियकर हे जवळचे मित्र होते, त्यामुळे केतनच्या हत्येचा प्लॅन हा आणखी काही जणांना माहीत असण्याचा संशय आहे. तसेच केतन डोक्याला विग वापरायचा ही माहिती लग्नाच्या आधी सियाल आणि तिच्या कुटुंबाला देण्यात आली होती. परंतु, हत्या करण्याचे हे काही कारण असू शकत नाही. लग्नासाठी नकार देणं हे सियासाठी खूप सोपे होते, त्यासाठी तिने केतनची हत्या करण्याची गरज नव्हती, असे विशाल अग्रवाल यांनी म्हटले आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

### ढिंग-टांग




'ऑपरेशन टायगर'मुळे ताकद वाढली; श्रीकांत शिंदेंना कॅबिनेट, तर राष्ट्रवादीलाही मंत्रिपदाची चर्चा

# केंद्रीय मंत्रिमंडळाचा लवकरच विस्तार

मुंबई (दै. संध्या)

'ऑपरेशन टायगर' यशस्वी करत उद्धव ठाकरे गटाच्या 6 खासदारांना आपल्या गोटात खेचणाऱ्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची दिल्ली दरबारात ताकद चांगलीच वाढली आहे. लोकसभेतील वाढलेले संख्याबळ लक्षात घेता येत्या 28 किंवा 29 जून रोजी होणाऱ्या संभाव्य केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात शिवसेनेला अतिरिक्त मंत्रिपदे मिळण्याची दाट शक्यता आहे. यात खासदार श्रीकांत शिंदे यांचे नाव कॅबिनेट मंत्रिपदासाठी आघाडीवर असून, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसलाही या फेरबदलात कॅबिनेटमध्ये सामावून घेतले जाणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराबाबत अधिकृत घोषणा झालेली नसली, तरी दिल्लीतील राजकीय हालचालींना वेग आला आहे.



सध्या केंद्रात शिवसेनेचा एकच मंत्री (प्रतापराव जाधव) आहे. मात्र, 'ऑपरेशन टायगर'नंतर वाढलेल्या बळामुळे शिवसेनेला आता एक कॅबिनेट आणि दोन राज्यमंत्री अशी एकूण तीन मंत्रिपदे मिळण्याची चर्चा सुरू आहे. 2024 मध्ये एनडीए सरकार स्थापन होताना शिवसेनेला कॅबिनेट मंत्रिपदाची ऑफर होती, मात्र डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ती नाकारली होती. आता बदललेल्या परिस्थितीत पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या आग्रहाखातर ते हे पद स्वीकारतील, अशी दाट चर्चा आहे. विद्यमान केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांच्याकडील 'आरोग्य राज्यमंत्रिपद' काढून घेऊन ते शिवसेनेच्याच नव्या खासदाराला दिले जाऊ शकते. मात्र, त्यांचा 'आयुष मंत्रालयाचा स्वतंत्र प्रभार' कायम राहील, असेही सूत्रांकडून समजते. दरम्यान, राज्यमंत्रिपदासाठी धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचे नाव चर्चेत आहे. उबाठा गटातून नुकतेच शिवसेनेत दाखल झालेले ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांचेही नाव मंत्रिपदाच्या शर्यतीत होते. मात्र, मुंबईत पत्रकारांना केलेली जाहीर अश्लील शिवीगाळ आणि 'बॉम्ब' टाकून मारण्याच्या धमकीमुळे त्यांची प्रतिमा मलिन झाली आहे. हायकमांड त्यांच्या या मुजोर वर्तनामुळे प्रचंड नाराज असून, त्यामुळे त्यांची मंत्रिपदाची संधी हुकल्याचे बोलले जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीवेळी राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) पदाची ऑफर देण्यात आली होती. मात्र, प्रफुल्ल पटेल यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने यापूर्वी कॅबिनेट पद भूषवले असल्याने, राष्ट्रवादीने 'कॅबिनेट'चा आग्रह धरत ती ऑफर नाकारली होती. आता या विस्तारात राष्ट्रवादीला कॅबिनेट मंत्रिपद दिले जाण्याची चिन्हे असून, यासाठी प्रफुल्ल पटेल यांचे नाव निश्चित मानले जात आहे. काही कारणास्तव तसे न झाल्यास प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना संधी मिळू शकते. जॉर्ज कुरियन यांचा राजीनामा: अल्पसंख्याक कार्य आणि पशुसंवर्धन राज्यमंत्री जॉर्ज कुरियन यांचा राज्यसभा कार्यकाळ 21 जून रोजी संपल्याने त्यांनी राजीनामा दिला आहे.

रवनीत सिंह बिट्टू पंजाबमध्ये सक्रिय होणार: बिट्टू यांचाही राज्यसभा कार्यकाळ संपला आहे. आगामी पंजाब विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांना राज्याच्या राजकारणात सक्रिय भूमिका दिली जाऊ शकते. 'एक व्यक्ती-एक पद' सूत्र: हर्ष मल्होत्रा (दिल्ली भाजप अध्यक्ष) आणि पंकज चौधरी (उत्तर प्रदेश भाजप अध्यक्ष) यांच्याकडे मंत्रिपदासोबतच संघटनात्मक जबाबदारी आहे. या सूत्रानुसार त्यांना मंत्रिपद सोडावे लागू शकते. गेल्या अवघ्या तीन महिन्यांत तब्बल 33 विरोधी खासदारांनी एनडीएमध्ये प्रवेश केला आहे. या पक्षांतर करून आलेल्या नेत्यांना सरकारमध्ये सामावून घेण्याचा भाजपचा प्रयत्न आहे.

# केतन अग्रवालची हत्या अनाकलनीय

## मुख्यमंत्र्यांचा सुशिक्षित तरुणांच्या मानसिकतेवर सवाल, नसरापूर खटल्याच्या निकालाचे कौतुक

पुणे (दै. संध्या)

लोहगड किल्ल्यावरून ढकलून करण्यात आलेली केतन अग्रवालची हत्या खरोखरच अनाकलनीय आणि धक्कादायक आहे. समाज म्हणून आपण याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे," अशी तीव्र प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. चांगल्या घरच्या आणि सुशिक्षित मुलांमध्ये अशी सूडबुद्धी आणि गुन्हेगारी प्रवृत्ती का निर्माण होते, याचा केवळ कायदेशीरच नाही तर सामाजिक अँगलनेही तपास झाला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.



पुण्याच्या लोहगड किल्ल्यावर केतन अग्रवालची त्याची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा बॉयफ्रेंड चेतन चौधरी यांनी मिळून निर्घृण हत्या केली होती.

पुण्यातील प्रख्यात बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांचा मुलगा केतनचा त्याची भावी पत्नी सिया गोयलने प्रियकर चेतन चौधरीच्या मदतीने लोहगड किल्ल्यावरून ४०० फूट खोल दरीत ढकलून खून केल्याचे पोलिस तपासात दिसून आले. या दोघांना न्यायालयाने २९ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

अटकेनंतर सियाचा प्रियकर चेतनने रडत रडत स्वत:चे वडील बाबूलाल चौधरी यांना सांगितले की, घटना घडली तेव्हा सिया केतनजवळ उभी होती, मी तर दूर उभा होतो. पोलिसांच्या तपासात असे निष्पन्न झाले की, जानेवारी ते जून २०२६ या सहा महिन्यात सिया व चेतनमध्ये २००४ कॉल झाले होते.

### दोन महिन्यांत ऐतिहासिक निकाल

१ मे २०२६ रोजी नसरापूरमध्ये घडलेल्या या पाशवी घटनेनंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयमाला पवार यांनी अवघ्या १५ दिवसांत तपास पूर्ण करत १२०० पानांचे आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. विशेष म्हणजे, न्यायालयाने सुट्टीच्या दिवसांतही काम करून केवळ दोन महिन्यांत हा खटला निकाली काढला आहे. राज्यातील हा आतापर्यंतचा सर्वात वेगवान ऐतिहासिक खटला ठरला असून, अशा जलद निकालांमुळे गुन्हेगारांवर कायद्याचा वचक बसेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

याचवेळी पुण्याच्याच नसरापूर येथील साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या करणाऱ्या ६५ वर्षीय भिमराव कांबळे या नराधमावरही मुख्यमंत्र्यांनी कडक शब्दांत भाष्य केले. विशेष न्यायालयाने या नराधमाला आधीच दोषी ठरवले असून, २९ जून रोजी त्याची शिक्षा सुनावली जाणार आहे. "हे अत्यंत दुर्मिळ आणि क्रूर प्रकरण असून, आम्ही न्यायालयाने या हैवानाला थेट मृत्यूदंडाची शिक्षा द्यावी अशी मागणी केली आहे, न्यायालय ती मान्य करेल अशी पूर्ण अपेक्षा आहे," असे मुख्यमंत्री म्हणाले.

## संपादकीय

# उत्तेजकांसह स्पर्धा.. क्रीडा जगताचं भविष्य बदलू घातलंय!

यावर्षी बीजिंगमध्ये झालेल्या एका हाफ मॅरेथॉनमध्ये एका ह्युमनॉइड रोबोटने मानवी धावपटूंना मागे टाकले. मानवी विक्रमापेक्षा तब्बल सहा मिनिटं आधी त्याने स्पर्धा पूर्ण केली. याच वर्षी मे महिन्यात आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण क्रीडा स्पर्धा पार पडली. अमेरिकेतील लास वेगास येथे चार दिवस 'एनहॅन्स्ड गेम्स'चे आयोजन करण्यात आले. एका खास स्टेडियममध्ये जगभरातील जलतरणपटू, अॅथलिट्स आणि वेटलिफ्टर सहभागी झाले होते. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे सहभागी खेळाडूंना वैद्यकीय देखरेखीखाली त्यांची कामगिरी सुधारणारी औषधे (परफॉर्मन्स एनहान्सिंग ड्रग्ज) वापरण्यास अधिकृत परवानगी होती. मुख्य प्रवाहातील क्रीडा स्पर्धांमध्ये अशा औषधांवर बंदी असते. २४ देशांतील ४२ खेळाडूंनी या नव्या प्रकारच्या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धांचे आयोजक सांगतात की, कामगिरी वाढविणाऱ्या औषधांच्या मदतीने मानवी शरीर किती मोठी झेप घेऊ शकते, हे दाखवून देणे हा यामागील उद्देश होता. क्रीडाक्षेत्र आणि स्पर्धांची व्याख्याच त्यांना बदलून टाकायची आहे. २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियातील उद्योजक अॅरॉन डिसोझा आणि अमेरिकेतील मॅक्सिमिलियन मार्टिन यांनी या स्पर्धांची सुरुवात केली. अब्जाधीश गुंतवणूकदार पीटर थिएल आणि डोनाल्ड ट्रम्प ज्युनियर यांच्यासह अनेक जगप्रसिद्ध, धनाढ्य व्यक्तींनी या उपक्रमाला पाठिंबा दिला आहे. प्रत्येक विजेत्याला अडीच लाख डॉलर्सचे बक्षीस देण्यात आले, तर विद्यमान जागतिक विक्रम मोडणाऱ्यांसाठी दहा लाख डॉलर्सचा विशेष बोनसही ठेवण्यात आला होता. खेळाडूंनी कोणतीही उत्तेजक किंवा कामगिरी वाढवणारी औषधे वापरू नयेत आणि नैसर्गिक क्षमतेच्या बळावर स्पर्धेत सहभाग घ्यावा हा क्रीडाजगताचा आजवर स्वीकारला गेलेला नियम आहे. 'एनहॅन्स्ड गेम्स' मात्र याच संकल्पनेला आव्हान देत आहेत. आयोजकांच्या मते, डोपिंगविरोधी यंत्रणा सातत्याने आणि न्याय्यपणे काम करत नाहीत, मुख्य प्रवाहातील क्रीडा स्पर्धांमध्ये खेळाडूंना पुरेसा आर्थिक मोबदला मिळत नाही. औषधांचा वापर वैद्यकीय सल्ल्यानुसार आणि सुरक्षितपणेच करण्यात येणार असल्याची खात्रीही त्यांनी दिली आहे. त्यामुळे क्रीडा क्षेत्रात एका नव्या युगाची सुरुवात होईल आणि मानवी कर्तृत्वाच्या मर्यादाच नव्याने स्पष्ट होतील, असा दावाही ते करत आहेत. लास वेगासमध्ये झालेल्या या पहिल्यावहिल्या स्पर्धेत सहभागी झालेल्या ४२ खेळाडूंनी टेस्टोस्टेरॉन, ईपीओ आणि अॅनाबॉलिक स्टेरॉइड्स यांसारखी प्रतिबंधित औषधे घेतली होती. मात्र त्याचवेळी अशा प्रकारची कोणतीही प्रतिबंधित औषधे न घेता स्पर्धा करणाऱ्या तीन खेळाडूंनीही या स्पर्धेत विजय मिळवला. विशेष म्हणजे, एवढ्या सर्व 'मदती'नंतरही केवळ एकच जागतिक विक्रम मोडला गेला. शेवटच्या दिवशी ग्रीक जलतरणपटू क्रिस्टियन ग्कोलोमेव याने पुरुषांच्या ५० मीटर फ्रीस्टाइल शर्यतीत २०.८१ सेकंदांची वेळ नोंदवली. ही वेळ विद्यमान जागतिक विक्रमापेक्षा केवळ ०.०७ सेकंदांनी चांगली होती. या स्पर्धांमधील विजेते किंवा विक्रमवीर यांची नोंद अधिकृत जागतिक क्रीडा विक्रमांमध्ये होणार नाही.

मात्र, त्या बदल्यात त्यांना घसघशीत आर्थिक मोबदला मिळाला. सुमारे अडीच लाख लोकांनी ही स्पर्धा यूट्यूबवर 'लाइव्ह' पाहिली. पुढील वर्षी आणखी मोठ्या स्तरावर आयोजन करण्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. हे क्रीडा जगताचं भविष्य आहे का? २०२६ च्या 'एनहॅन्स्ड गेम्स'मध्ये फारसे मोठे विक्रम प्रस्थापित झाले नाहीत.

एका खेळाडूने म्हटल्याप्रमाणे, 'विजयासाठी केवळ रसायनशास्त्र पुरेसे नसते,' हेच या स्पर्धेने सिद्ध केले असावे. बदल आणि उलथापालथ हा आज आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रगत तंत्रज्ञान, रसायने आणि यंत्रांवर आधारित एक नवे जग आकार घेत आहे.

## संस्कृत सुभाषित

प्राणा: प्राणभृतामन्नं तदयुक्त्या निहन्त्यसून ।
विषं प्राणहरं तच्च युक्तियुक्तं रसायनम्।।

अन्न हे सर्व प्राणीमात्रांचे जणू प्राणच ठरते पण अयोग्य अन्न सेवन केल्यास तेच विष बनून प्राणांचे हरण करते परंतु विचाराने व युक्तीवादाने अन्न ग्रहण केल्यास अयोग्य अन्नसुद्धा उपकारक रसायन ठरते.

## गुरु वचन

### परमेश्वराचे नामस्मरण करा

मानवी शरीर परमेश्वराच्या कृपेने आणि केवळ परमेश्वराच्या प्राप्तीसाठीच मिळते. यासाठी सर्व काम सोडून परमेश्वराचे नामस्मरण करायला हवे. ज्यांचे वय जास्त झाले आहे, त्यांना परमेश्वराचे नामस्मरण करणे आहेच, पण ज्यांचे वय कमी आहे, त्यांनीही स्वच्छ मनाने परमेश्वराचे नामस्मरण करावे लागणार आहे. सृष्टीतील सर्व कामे करायची आहेत पण आपला मुख्य हेतू आणि लक्ष्य केवळ परमेश्वराला प्राप्त करणे असावे. अस्तित्त्वामध्ये सत्ता एका परमात्म्याची आहे. संसाराकडे ध्यान दिले ते सर्व नष्ट होणार आहे आणि निरंतर नष्ट होत राहील. आपण आपल्यापरीने पहायला हवे की, आपण जेव्हा जन्मलो त्यावेळी शरीराची कशी अवस्था होती व आज कशी आहे. संसार नेहमी बदलणारा आहे तर परमात्मा कायमस्वरुपी आहे. परमात्मा आपला आणि आपण परमात्म्याचे आहोत. या दृढता असायला हवी. एखादा लहान मुलाला आईविषयी विचारले तर तो म्हणते ती माझी आई आहे. परंतु आई का आहे याचे तो उत्तर देत नाही. त्याच्या मनात हा प्रश्न निर्माण होतो की आई त्याची का आहे. आई त्याची आहे याविषयी काही संशय नाही. अशाप्रकारे आपणही संशय करु नका आणि ही गोष्ट पूर्ण विश्वासाने निश्चित करा की, परमेश्वर माझा आहे आणि परमेश्वराशिवाय दुसरे काहीही माझे नाही. कारण ते बाकी सर्व तुम्हाला सोडून जाणार आहेत. ज्याच्याविषयी आपण चिंतेत राहतात. पैसे, घर, जमीन सर्वकाही आहे तिथेच राहणार आहे आणि त्याचे स्मरणही राहणार नाही. स्मरण राहील तर परमेश्वराचे. जर आपल्याला स्मरण राहत असेल तर तुम्ही सांगा आपण या जन्मापूर्वी कोठे होता. आपले आई-वडिल, भाऊ-बहीण, स्त्री-पुरुष आदी कोन होते, आपले घर कोणते होते. जसे पूर्वजन्माची आठवण नाही तसेच या जन्माचीही आपल्याला आठवण राहणार नाही. ज्याची आठवणही होणार नाही, त्यासाठी आपण विनाकारण परेशान होत आहात.

## उपदेशकथा

### वेड्यांचा बाजार

एका शहरात एक वेड्यांचे इस्पितळ होते. तेथील वेडे पहावे म्हणून एक माणूस इस्पितळात गेला. त्याने अनेक वेडे पाहिले. त्यांच्यापैकी त्याने एक तरुण व सुरेख वेडा पाहिला. त्याच्या शेजारी बसून त्याने त्याला विचारले की, 'अरे, तू येथे कसा आलास?' तो तरुण म्हणाला, 'तुमचा हा प्रश्न बरोबर नाही पण त्याचे उत्तर मी देतो. त्याचे असे झाले, मी लहानपणापासून बुद्धिमान होतो त्यामुळे माझ्या वडिलांना वाटे मी मोठा विद्वान व्हावा. माझ्या आईला वाटे मी मोठा श्रीमंत व्हावा. माझ्या शिक्षकांना वाटे मी मोठा पुढारी व्हावा. माझ्या गायनशिक्षकाला वाटे मी मोठा गवई व्हावा. या साऱ्या गोंधळामध्ये माझा मी हरवून बसलो. माझे मन कशातच लागेना म्हणून एका डॉक्टरच्या सल्ल्याने मला येथे आणून सोडले. येथे मला बरे वाटते. कारण माझा मी माझ्यापाशी असतो. माझ्याबद्दल मी विचार करू शकतो.' हे सांगून तो मानलेला वेडा क्षणभर थांबला आणि त्याने त्या माणसाला विचारले की, 'शिक्षण, स्पर्धा आणि महत्त्वाकांक्षा यांच्यापायी वेड लागून तुम्ही येथे आलात काय?' तो म्हणाला, 'नाही, तसे नाही. मला माझे वेड लागले आहे. त्या मीचे निरोगी स्वरुप दाखवणारा कोणी आहे काय ते पाहण्यास मी येथे आलो.' तेव्हा तो तरुण म्हणाला, 'म्हणजे वेड्यांच्या बाजारातून तुम्ही इकडे आलात.'

कथा उपदेश : प्रत्येक माणूस वेडाच आहे. दृश्याचे वेड सोडून अदृश्याचे वेड लागलेली माणसेच जीवनात स्वस्थ होतात.



## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | ऋतु- सौर ग्रीष्म |
| २७ जून २०२६ | शुक्ल पक्ष |
| शनिवार | तिथि:त्रयोदशी |
| विक्रम संवत्- २०८२ | २४:४३:३९+ |
| निज ज्येष्ठ शके | नक्षत्र:अनुराधा |
| संवत्- १९४८ | २२:१०:५० |
| संवत्सर - पराभवनाम | योग:साध्य १२:३१:४६ |
| अयन- दक्षिणयन | करण:कौलव ११:३२:२९ |
| मास- निज ज्येष्ठ | करण:तैतिल |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९९३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 7 | 2 | | 8 | 9 | | |
| 2 | 9 | | 7 | | | | | 8 |
| | | | 6 | 1 | | 2 | 4 | |
| 5 | | | | | | | | |
| 1 | 3 | | 9 | 4 | 5 | | 2 | 6 |
| | | | | | | | | 4 |
| | 7 | 1 | | 6 | 2 | | | |
| 9 | | | | | 7 | | 1 | 2 |
| | | 4 | 3 | | 1 | 8 | 7 | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९९२ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 6 | 2 | 8 | 9 | 7 | 3 | 5 | 1 |
| 1 | 7 | 8 | 3 | 5 | 2 | 9 | 4 | 6 |
| 9 | 5 | 3 | 4 | 6 | 1 | 7 | 2 | 8 |
| 5 | 9 | 7 | 1 | 4 | 3 | 6 | 8 | 2 |
| 2 | 3 | 4 | 5 | 8 | 6 | 1 | 7 | 9 |
| 8 | 1 | 6 | 7 | 2 | 9 | 5 | 3 | 4 |
| 6 | 8 | 9 | 2 | 3 | 5 | 4 | 1 | 7 |
| 3 | 4 | 1 | 9 | 7 | 8 | 2 | 6 | 5 |
| 7 | 2 | 5 | 6 | 1 | 4 | 8 | 9 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ०६७८ – संत अगाथो पोपपदी.
- १५४२ – हुआन रॉद्रिगेझ काब्रियोने कॅलिफोर्नियावर स्पेनचे आधिपत्य जाहीर केले.
- १७०९ – पीटर पहिल्याने चार्ल्स बाराव्याचा पराभव केला.
- १९५३ – जोसेफ लेनियेल फ्रांसच्या पंतप्रधानपदी.

### राष्ट्रीय

- १९६६ – महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद चिघळून कर्नाटकात मोठ्या प्रमाणात दंगली झाल्या.
- २००७ – प्रसिध्द उद्योगपती विजयपत सिंघानिया यांना गरम हवेचा फुगा २१ हजार ०२७ मीटर उंचीवर उडवण्याचा जागतिक विक्रम केल्याबद्दल गिनिज बुकात स्थान मिळाले.

### जन्म

- १०४० – लाडिस्लॉस पहिला, हंगेरीचा राजाचा जन्म.
- १३५० – मनुएल दुसरा पॅलिओलॉगस, पूर्व रोमन सम्राटचा जन्म.
- १४६२ – लुई बारावा, फ्रांसचा राजाचा जन्म.
- १५५० – चार्ल्स नववा, फ्रांसचा राजाचा जन्म.
- १८६४ – प्रखर राष्ट्रीय नेते आणि काळ या साप्ताहिकाचे संपादक शिवराम महादेव परांजपेचा जन्म.
- १८६९ – हॅन्स स्पेमन, जर्मन प्राणीशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेताचा जन्म.
- १९१७ – खंडेराव रांगणेकर, भारतीय क्रिकेटपटूचा जन्म.

### निधन

- ११४९ – अँटिओखचा रेमंडचे निधन.
- १४५८ – आल्फोन्से पाचवा, अरागॉनचा राजाचे निधन.
- १८३९ – रणजितसिंग, पंजाबातील शिखांच्या राज्याचे पराक्रमी संस्थापकाचे निधन.

## : SMS :

LECTURER:
Write a Note on
Gandhi Jayanti.
CIRCUIT WRITES:
Gandhi was a
great man,
but maa kasam i
dont know who
is Jayanti.
Koi locha-lafda hoga

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३३.३ | २४.६ |
| अहमदनगर | ३२.८ | २३.४ |
| अकोला | ३६.२ | २६.१ |
| अमरावती | ३५.७ | २५.६ |
| बीड | ३९.५ | २६.१ |
| भंडारा | ३९.१ | ३०.६ |
| बुलढाणा | ४२.७ | ३१.१ |
| चंद्रपूर | ३८.८ | २६.१ |
| चेन्नई | ४१.४ | २९.६ |
| नवी दिल्ली | ४२.९ | ३४.५ |
| धुळे | ३७.६ | २६.२ |
| गोंदिया | ३९ | २९.६ |
| जळगाव | ३५.४ | २६ |
| कोल्हापूर | ३०.३ | २०.८ |
| लातूर | ३१.५ | २४.२ |
| मुंबई | ३४.४ | ३१.५ |
| नागपूर | ३९.२ | २९.५ |
| नांदेड | ३५.८ | २५.८ |
| नंदूरबार | ३५.२ | २६.१ |
| नाशिक | ३३.७ | २३ |
| पुणे | २९.८ | २१.८ |
| पंढरपूर | ३५.४ | २४.६ |
| सातारा | ३१.३ | २०.१ |
| सांगली | ३२.८ | २१.४ |
| सोलापूर | ३३.९ | २५.३ |
| वर्धा | ३८.५ | २६.८ |



## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पश्चिम
गती मध्यम राहील. अडचणींचा सामना करावा लागेल.

**तूळ :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : पूर्व
विचार करुन कामे केल्यास परिस्थिती सुदृढ बनवू शकेल.

**वृषभ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण
कौटूंबिक सुख आणि आर्थिक अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहिल. उद्योगधंदा चांगला चालेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पश्चिम
सहकार्याने दिवस उत्साहपूर्ण जाईल. थकित पैसे मिळवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**मिथून :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पश्चिम
सामाजिक कार्यांमुळे सुयश आणि सन्मान मिळू शकेल. कामे पूर्ण होतील.

**धनू :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण
योजनेनुसार कामे केल्यास फायदा होईल. कौटूंबिक जबाबदाऱ्या पार पाडू शकाल.

**कर्क :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण
बुद्धि आणि मनोबलाने सुख-संपन्नतेची परिस्थिती बनेल.आळस सोडून द्या.

**मकर :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
दूरदर्शिपणाने आणि बुद्धिचातूर्याने समस्या दूर होतील. आडंबरांपासून दूर रहा.


**सिंह :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व
नवीन कामकाजांचे योग प्रबळ आहेत.कौटूंबिक समस्या राहू शकतात.

**कुंभ :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व
वातावरण अनुकूल असूनही कामे होऊ शकणार नाही. खर्च विचार करुन करा.

**कन्या :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पूर्व
मानसिक तनावापासून सुटका मिळेल.उद्योगधंदा ठीक चालेल.

**मीन :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पश्चिम
प्रयत्न सार्थक होतील. परिवर्तन किंवा नवीन संधी फायदेशीर राहतील. प्रवास कष्टदायी होऊ शकतात.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९९३



**आडवे शब्द**

१. प्रदीर्घ कथा
४. मेहरबानी
७. गुलाबपाकळ्या आणि खडीसाखर एकत्र
११. रत्न
१३. नमुना
१५. रुग्णालय
१७. किती उगाळला तरी काळाच!
१८. लढतना आलेले मरण
२०. नमस्कार
२२. तृष्णा
२४. एक गळित धान्य, पालेभाजी
२६. वीरश्रीची गाणी
२९. पदार्थाचा सूक्ष्म भाग
३१. झोंबणारे
३२. सैन्याची तुकडी
३३. कलावंत
३५. न वापरलेला
३६. विमानवेधी यंत्रणा
३७. टाकाऊ वस्तू
३८. मैत्रीण
३९. नंतर
४१. काटक्यांचा झाडू
४३. मनुष्य
४४. अखंड पडणारा पाऊस
४५. दुलई
४७. किंचित वक्रता
४८. अत्यंत तिखट, बारीक मिरची
४९. माया, जिव्हाळा
५१. एक चतुर्यांश
५२. तंबूची कापडी भिंत
५४. घोड्याचे घर
५७. समुद्र
५९. गवंडी
६१. आणि
६२. घराची अब्रू घालवणारा
६४. झकास
६५. मुख्य गायकाबरोबरचा ताफा
६७. राष्ट्र
६८. रात्री सुगंध पसरवणारी वनस्पती
७०. आजच्या आधीचा दिवस
७१. साथ, संगत
७२. एकत्रित आवाज
७५. परमेश्वर
७७. चावट
७९. माफी मागणे
८२. तुरुंग
८४. अधिक श्रेष्ठ
८५. वारा
८६. एखाद्या अवयवास मुंग्या येणे

**उभे शब्द**

१. कानातील मळ काढण्याचे साधन
२. पाऊस (हिंदी)
३. पद्धत
५. रज:कण
६. लक्ष्मीचे एक नाव
७. विकत घेतलेला सेवक
८. जमिनीखाली येणारे फळ
९. औषध
१०. दुर्दशा
१२. नूतन
१४. एक मंगलवाद्य
१६. वैयक्तिक
१९. नदीचा काठ
२१. धमनी
२३. जादू
२५. दुप्पट (इंग्रजी)
२७. भ्रमर
२८. सिद्ध
२९. काटकसर
३०. क्षणजीवी
३१. ओरखडा
३२. विनोबाजींच्या आश्रमाचे नाव
३४. घाबरलेला
३५. कोन मोजण्याचे साधन
३८. सूट
४०. गारच्या विरुद्ध
४२. धातूवरील देवप्रतिमा
४४. गीत, वाद्य यांचा मिलाफ
४६. सीतेचे वडील
५०. तारक
५३. जन्मपत्रिकेतील आद्याक्षरानुसार ठेवले जाणारे नाव
५५. बेधडक, नि:शंकपणे
५६. शरम
५८. सुंदर तरुणी
६०. जळजळीत तीव्र
६३. पात्र, योग्य
६६. प्रेम निर्माण करणारा, वाढवणारा
६९. कन्या, पुत्री
७०. भुकेच्या वेळी होणारा काकराव
७३. छोटा
७४. सूचक चिन्ह-रोगाचे वा प्रेमरोगाचे!
७६. विशेष
७८. निरंतर साधना
८०. खंदक
८१. होडी
८३. 'प्रहार' करणारे मंत्री (आडनाव)

**जम्बो शब्दकोडे क्र. ९९२ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.पाकळी ३.माशी शिंकणे ६.दानत ८.कर्म ९.पळी १०.सरसरीत ११.चाकरी १२.पावनखिंड १४.पावा १५.खरी १६.क्षमायाचक १८.भोळाशंकर २०.गाकर २१.पारवा २३.वाळा २४.काक २५.वाढ २६.वाळका २७.पगार २९.लाज ३१.वटवट ३३.सहाय्यक ३५.वधारणे ३७.गदा ३८.तरतम ३९.खेटर ४१.बारका ४३.तारा ४४.मळमळ ४६.खडतर ४८.खतरनाक ५०.वग ५२.तोबरा ५३.रसातल ५५.जळजळीत ५७.बरकत ६०.भारी ६१.नगरसेवक ६४.प्रस्थ ६५.बुधवार ६६.डळमळीत ६८.मध ६९.रजनीश ७०.रूप

उभे उत्तर : १.पाक २.कर्मचारी ३.माळी ४.करनकर ५.विसरभोळा ६.दात ७.तलवार ९.परीक्षक १०.सडक १२.पाया १३.वचपा काढणे १४.पाककला १५.खर्च १७.मारवा १९.शंका २०.गाढव २२.वापर २३.वारसदार २५.वाटप २८.जय्यत ३०.जनमत ३२.टवटवीत ३४.करवत ३६.धार ३७.गबाळ ४०.घोळ ४२.काखमांजरी ४३.तारे तोडणे ४४.मकर ४५.मदत ४७.रवळी ४८.खराब ४९.रक्षक ५१.गतकाल ५४.सागर ५६.जळी स्थळी ५८.रविवार ५९.तन ६०.भाकड ६२.गजर ६३.सेनानी ६४.प्रमदा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### टीईटी'साठी उमेदवारांना 'बूट'बंदी

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे येत्या रविवारी (२८ जून) होणाऱ्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेत (टीईटी) गैरप्रकार रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्या अंतर्गत उमेदवारांना बूट घालण्यास मनाई करण्यात आली आहे. उमेदवारांना चप्पल, स्लीपर, सँडल अशी उघडी पादत्राणे वापरण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी या बाबतची माहिती दिली. टीईटी परीक्षेसाठी उच्चांकी ४ लाख २८ हजार १२२ उमेदवारांनी मिळून पेपर एक आणि पेपर दोन मिळून एकूण ६ लाख १२५ अर्ज केले आहेत. नोंदणी केलेल्यांमध्ये २ लाख २६ हजार २६३ कार्यरत शिक्षकांचा समावेश आहे. दोन सत्रांत ही परीक्षा घेतली जाणार आहे. परीक्षेच्या दिवशी परीक्षा केंद्रावर उमेदवारांची तपासणी, झडती (फ्रिस्किंग), ओळख पडताळणी करणे, हजेरी नोंदवणे यासाठी उमेदवारांनी परीक्षा सुरू होण्याच्या वेळेच्या किमान दीड तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. परीक्षेच्या दिवशी वाहतूक समस्या किंवा अन्य समस्या लक्षात घेऊन वेळेआधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रवेशासाठीच्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षार्थींना प्रवेश दिला जाणार नाही. ओळखीच्या पुराव्यासाठी आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पारपत्र, पॅन कार्ड, स्मार्ट कार्ड प्रकारचा वाहन परवाना यापैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र सादर करणे अनिवार्य आहे. परीक्षेच्यावेळी प्रवेशपत्र आणि वर दिलेल्या वैध ओळखपत्रांपैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र आणि त्याची सुस्पष्ट छायांकित प्रत सादर न केल्यास परीक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल, असे नमूद करण्यात आले आहे.

### पुणेकरांनो लक्ष द्या! रविवारी पुणे रेल्वे स्थानकावर 9 तासांचा विशेष ब्लॉक

पुणे (दैनिक संध्या) : महत्त्वाच्या तांत्रिक कामांसाठी पुणे रेल्वे स्थानकावर रविवारी (५ जुलै) सकाळी आठ ते सायंकाळी पाच या वेळेत रेल्वेकडून नऊ तासांचा विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे पुण्यातून सुटणाऱ्या, पुणे स्थानकात येणाऱ्या अनेक गाड्या रद्द, अशंतः रद्द आणि दुसऱ्या स्थानकातून सोडण्यात येणार आहेत. या कालावधीत प्लॅटफॉर्म क्रमांक १ आणि प्लॅटफॉर्म क्रमांक २ सीएसएमटी टोकाकडून वाहतुकीसाठी उपलब्ध राहणार नाहीत. तर प्लॅटफॉर्म क्रमांक २, ३ आणि ४ वरून सीएसएमटीच्या दिशेने रेल्वेची वाहतूक उपलब्ध नसल्याची माहिती मध्य रेल्वेच्या पुणे विभागाकडून निवेदनाद्वारे देण्यात आली. दरम्यान, प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल रेल्वे प्रशासनाकडून दिलगीरी व्यक्त करण्यात आली आहे. तसेच प्रवास सुरू करण्यापूर्वी रेल्वेच्या http://www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट देऊन किंवा अधिकृत एनटीएस ॲपवरून अद्ययावत वेळापत्रक तपासण्याचे आवाहन रेल्वेकडून करण्यात आले आहे. पुणे-तळेगाव, सकाळी पावणे आठ वाजता सुटणारी तळेगाव-पुणे, पुणे-दौंड आणि सातारा-पुणे या लोकल-डेमू गाड्यांसह पुणे-सीएसएमटी मुंबई एक्सप्रेस आणि सीएसएमटी मुंबई-पुणे एक्सप्रेस रद्द करण्यात येणार आहे. लोणावळा-पुणे लोकल आणि तळेगाव-पुणे लोकल शिवाजीनगर स्थानकावर, तर बारामती-पुणे डेमू दौंड स्थानकावर थांबविण्यात येणार आहे. याशिवाय जयपूर-पुणे एक्सप्रेस आणि सीएसएमटी मुंबई-पुणे एक्सप्रेस खडकी स्थानकावर, जम्मू तवी-पुणे एक्सप्रेस, अमरावती-पुणे एक्सप्रेस आणि नागपूर-पुणे एक्सप्रेस हडपसर स्थानकावर थांबविण्यात येणार आहेत.

### एमपीएससी परीक्षांबाबत मुख्यमंत्र्यांचा मोठा निर्णय:खासगी शिकवणी चालकांनाही इशारा

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएसी) परीक्षा ऑनलाइन घेण्याच्या निर्णायामुळे विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता आहे. मात्र आयोगाने कोणतेही एकतर्फी निर्णय घेऊ नयेत. विद्यार्थ्यांबरोबर व्यापक चर्चा करूनच योग्य तो निर्णय घ्यावा अशी सूचना आयोगाच्या अध्यक्षांना केली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे शुक्रवारी दिली. दरम्यान या प्रश्न राजकीय नाही. एमपीएसीच्या परीक्षांमध्ये मोठे बदल केले जाणार आहेत. ही स्पर्धा पारदर्शी आणि नियोजित वेळेत व्हावी यासाठी राज्य शासनाचे प्रयत्न आहेत. त्यामुळे या निर्णयावरून खासगी शिकवणी चालकांनी त्यासाठी विद्यार्थ्यांना वेठीस धरू नये असा इशाराही त्यांनी दिला. सारथीच्या वतीने युपीएसससी आणि एमपीएसी मधील यशस्वी विद्यार्थी आणि त्यांच्या पालक सत्कार समारंभात ते बोलत होते.

# रांगोळ्यातून उलगडले छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य

**धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती, पुणे आणि जनहित चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन**

पुणे (दै. संध्या)



सिंहाशी झुंज देताना धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज, त्यांचे बंदिवासातील प्रसंग, मराठ्यांच्या सागरी सामर्थ्याचे वर्णन करणाऱ्या रांगोळ्या, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांची एकत्रित रांगोळी तसेच राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यातील वात्सल्यपूर्ण नात्याचे दर्शन घडविणाऱ्या आकर्षक रांगोळ्यांनी धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती, पुणे आणि जनहित चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रांगोळी प्रदर्शनात पुणेकरांचे लक्ष वेधले.

धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनातील विविध छटा उलगडणारे आकर्षक रांगोळी प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे, धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती, पुणेचे अध्यक्ष पियुष विजयकुमार शहा, उपाध्यक्ष निलेश खाणेकर, जनहित चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश ढमढेरे, उत्सव प्रमुख रोहन जाधव आदी मान्यवरांच्या उपस्थितीत रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. श्रीरंग कलादर्पण च्या रांगोळी कलाकारांनी रांगोळ्या काढल्या.

रांगोळी प्रदर्शनामध्ये संभाजी महाराजांचा जन्म, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांची एकत्र रांगोळी, छत्रपती संभाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक, तसेच महाराजांच्या शौर्य, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेचे दर्शन घडविणाऱ्या विविध रांगोळ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या रांगोळ्यांमधून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे विविध पैलू उलगडण्यात आले आहेत.

याचबरोबर दिवसभर महिला स्वच्छतादूत भगिनींसाठी ब्रेस्ट कॅन्सर शिबिर, ज्येष्ठ नागरिकांसाठी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर तसेच ईसीजी, सीबीसी, मधुमेह, रक्तदाब, दंत तपासणी आदी विविध तपासण्यांसह आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. रक्ताचा प्रत्येक थेंब अमूल्य असल्याचा संदेश देत भव्य रक्तदान शिबिरही आयोजित करण्यात आले होते. गोशाळांना गोधनाच्या खाद्यस्वरूपात मदत करण्यात आली.

## जन्म-मृत्यू दाखले रखडले!

पुणे (दै. संध्या)

महापालिकेतील जन्म व मृत्यू दाखल्यांमधील दुरुस्तीची कामे महिनाभरापासून रखडली आहेत. याची दखल स्थायी समितीच्या बैठकीत घेण्यात आली. नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात विशेष अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हे अधिकारी नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यांना आवश्यक मार्गदर्शन करतील, अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. 'जन्म-मृत्यू दाखले देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअरमध्ये तांत्रिक अडचणी आहेत. यामुळे गेल्या महिनाभरापासून हजारो अर्ज प्रलंबित आहेत. त्यातच सध्या सुरू असलेल्या शाळा, महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी तसेच पासपोर्ट, आधार, मतदान ओळखपत्र, वारसा, बँक आणि इतर कामांसाठी हे दाखले लागत असल्याने ही कामे रखडली आहेत. या विषयावर स्थायी समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली,' असे भिमाले यांनी सांगितले. जन्म-मृत्यू दाखल्यांमधील नाव, जन्मतारीख, पालकांचे नाव, लिंग, अशा दुरुस्त्यांचे अधिकार महानगरपालिकेला देण्यासंदर्भात राज्य शासनाशी आयुक्त स्तरावर प्रशासन संपर्क साधणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी ४९ पदे मंजूर

**आमदार राहुल कुल यांच्या पाठपुराव्याला यश**

पुणे (दै. संध्या)

दौंड शहरासह तालुक्यातील नागरिकांना अधिक सक्षम आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. ५० खाटांवरून १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यात आलेल्या दौंड उपजिल्हा रुग्णालयासाठी राज्य शासनाने ४९ नवीन नियमित पदांच्या निर्मितीस मंजुरी दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने जाहीर केला आहे.

या रुग्णालयाच्या विस्तारित इमारतीसाठी यापूर्वीच ३३ कोटी ५२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात



आला असून, सध्या बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. नव्याने मंजूर झालेल्या पदांमुळे रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

"दौंड तालुक्यातील शेवटच्या घटकापर्यंत उत्तम आरोग्य सुविधा पोहोचवणे हे आमचे ध्येय आहे. ३३ कोटी ५२ लाख रुपये खर्चून उभारली जाणारी सुसज्ज इमारती पूर्ण होत आली आहे, आणि आता ४९ नवीन पदे मंजूर झाल्यामुळे रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांचे उपचार मिळतील. लवकरच या विस्तारित रुग्णालयाचे लोकार्पण करून ते जनतेच्या सेवेत समर्पित केले जाईल."

**— आमदार राहुल कुल (दौंड विधानसभा मतदारसंघ)**

मंजूर करण्यात आलेल्या पदांमध्ये बधिरीकरण शास्त्रज्ञ, अस्थिव्यंग तज्ज्ञ, नेत्रशल्य चिकित्सक, दंतचिकित्सक, अपघात कक्ष वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, रक्तपेढी तंत्रज्ञ, एक्स-रे व ईसीजी तंत्रज्ञ, भौतिकोपचार तज्ज्ञ, आहारतज्ज्ञ, प्रशासकीय अधिकारी, लिपिक तसेच परिचर आणि सेवक अशा विविध पदांचा समावेश आहे.

यामुळे दौंड तालुक्यातील रुग्णांना अनेक विशेष वैद्यकीय सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार असून, गंभीर उपचारांसाठी पुणे किंवा इतर शहरांमध्ये जाण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. या निर्णयामुळे दौंड तालुक्यातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, विस्तारित रुग्णालय लवकरच जनतेच्या सेवेत दाखल होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पुणे विभागातील २२ शेतकऱ्यांना विविध कृषी पुरस्कार जाहीर

**१ जुलै कृषी दिनी पुरस्कारांचे वितरण**

पुणे (दै. संध्या)

पुणे विभागातील पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यातील कृषी फलोत्पादन आणि संलग्न क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २२ शेतकऱ्यांना विविध कृषी पुरस्कार जाहीर झाले असून १ जुलै रोजी कृषी दिनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार असल्याची माहिती विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी कळविली आहे. कृषी उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरीता योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांचा आणि कृषि विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी करणा-या व्यक्ती, संस्था, गट, अधिकारी, कर्मचारी यांना महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), उद्यान पंडीत, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, पीकस्पर्धा विजेते, पद्मश्री. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात येते. विविध कृषी पुरस्कार सन २०२३ व सन २०२४ साठी महाराष्ट्र राज्यातून अनुक्रमे ९१ व ९८ शेतकरी, कर्मचारी यांना शेतकरी व कृषि विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत पुरस्कार जाहीर झाले. एकूण पुरस्कारप्राप्त शेतक-यांपैकी पुणे विभागातील अहिल्यानगर, पुणे व सोलापूर येथील २२ शेतकरी, कर्मचारी यांची निवड झाली आहे. अहिल्यानगर ५, पुणे ८ व सोलापूर जिल्ह्यातील ९ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

पुरस्कार वितरण सोहळा डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी, मुंबई-१८ येथे आयोजीत करण्यात आला आहे.

सन २०२३ मधील पुरस्कार विजेते : शिवानंद मल्लेशी शिंगडगाव (मंद्रूप, सोलापूर) श्रद्धा सत्यवान ढवन (मोरवाडी अहिल्यानगर) कांतीलाल किसन नलगे (नागरगाव पुणे) प्रवीण दिलीप माने (बैरागवाडी सोलापूर) राहूल भारत बनकर (करकंब सोलापूर) सदाशिव मनोहर चौघुले (जुजारपूर सोलापूर) गणपतराव बाळासाहेब शिंदे (रहिमतपूर अहिल्यानगर) यतीन बापूराव घुले (काटेवाडी पुणे) प्रणव राजकुमार बिराजदार ( निंबर्गी सोलापूर) आदिवासी एकता शेतकरी गट (गुंजाळवाडी अहिल्यानगर) नविनचंद्र हरिश्चंद्र बोराडे,उप कृषी अधिकारी (मावळ पुणे)

सन २०२४ मधील पुरस्कार विजेते : समीर मोहनराव डोंबे (खोर पुणे) छाया तानाजी पवार (कुरणेवाडी पुणे) खुशालचंद्र बाबासाहेब मोरे (बारलोणी सोलापूर) योगेश नामदेव धनगर (तांदुळवाडी पुणे) सुरज सुखदेव अवताडे ( एखतपूर सोलापूर ) अमर अशोकराव भोसले (सराटी पुणे) गोवर्धन प्रल्हाद खेडकर (भालगाव अहिल्यानगर) संतोष भिकाजी धुमाळ (पेठ पुणे ) गंगाधर प्रफुल्लचंद्र बिराजदार (निंबर्गी सोलापूर) शंकर जगन्नाथ केंगले (डोण पुणे) सुखदेव ज्ञानदेव जमधडे (शेवगाव अहिल्यानगर)

## पुणे महापालिका टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी करणार नियमावली!

पुणे (दै. संध्या)

शहरात पाणीकपात सुरू असल्याने नागरिकांना दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. अनेक भागांत पाणीटंचाई भेडसावत असल्याने टँकरनेही पाणी दिले जाते. टँकरने केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्यामध्ये पारदर्शकता तसेच अधिकाधिक सुरक्षितता यावी, यासाठी मार्गदर्शक नियमावली (एसओपी) तयार करण्याचे आदेश स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिले. महापालिकेच्या स्थायी समितीची बैठक झाली. त्यामध्ये शहरातील पाणीटंचाई, टँकरचालकांकडून पाण्यासाठी घेतले जाणारे शुल्क, खासगी टँकरचालकांकडून होणारी नागरिकांची लूट अशा विषयांवर जोरदार चर्चा झाली. 'जादा दराने केली जाणारी पाणीविक्री, टँकर उशिरा पोहोचणे, 'जीपीएस' प्रणालीचा अभाव, रस्त्यांवरील अपघात, पाण्याच्या गुणवत्तेबाबतच्या तक्रारी आणि नियमनाचा अभाव अशा अनेक समस्या येत आहेत. या सर्व बाबींचा विचार करून एकसमान आणि प्रभावी कार्यपद्धती निश्चित करणे आवश्यक आहे,' असे भिमाले यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. 'शहरातील टँकर पुरवठ्याची सद्य:स्थिती, महापालिकेचे व खासगी टँकरची संख्या, टँकर भरणा केंद्रांची क्षमता, अधिकृत दर, अपघातांची आकडेवारी, यासह चालकांची पात्रता, जीपीएस यंत्रणा, ऑनलाइन बुकिंग व्यवस्था, पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी आणि नियंत्रण कक्षाबाबत महापालिका प्रशासनाने तातडीने सविस्तर माहिती स्थायी समितीसमोर सादर करावी,' अशा सूचना देण्यात आल्या.

## महाराष्ट्राच्या १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने संरक्षण उत्पादनाचा मोलाचा वाटा : **शुभम गुप्ता**

पुणे (दै. संध्या)



महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठण्यासाठी संरक्षण उत्पादन क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. राज्यात संरक्षण उत्पादन उद्योगाला चालना देत नवसंशोधन, संशोधन आणि स्वदेशीकरणाला प्रोत्साहन देण्यावर भर दिला जात आहे. यामुळे देशाच्या संरक्षण क्षमतेत वाढ होण्यासोबतच राज्यातील उद्योग, उद्योजक आणि स्टार्टअप्ससाठी नवीन संधी उपलब्ध होत आहेत, असे प्रतिपादन पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शुभम गुप्ता यांनी केले.

विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाच्या संरक्षण उत्पादन विभागाच्या वतीने 'संरक्षण उत्पादनातील आत्मनिर्भरता' या विषयावरील राष्ट्रीय स्तरावरील विभागीय शिखर परिषदेत श्री. गुप्ता बोलत होते.

यावेळी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे संचालक सुधन्वा कोपर्डीकर, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राचे प्रतिनिधी चेतन धारिया, संरक्षण विभागाचे ब्रिगेडियर विरेश, उद्योग विभागाचे सहसंचालक संदीप रोकडे, महाव्यवस्थापक अर्चना कोठारी, उद्योग संचालनालयातील अधिकारी तसेच पुणे विभागातील पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील उद्योजक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

श्री. गुप्ता म्हणाले, केंद्र सरकारच्या 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया' उपक्रमांना पूरक ठरत महाराष्ट्रात संरक्षण क्षेत्रातील उत्पादन, तंत्रज्ञान विकास आणि आधुनिक उपकरणांच्या निर्मितीला गती मिळत आहे. संरक्षण उत्पादन क्षेत्रात स्थानिक उद्योगांचा सहभाग वाढवून आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. ड्रोन, इलेक्ट्रॉनिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता , सायबर सुरक्षा आणि प्रगत अभियांत्रिकी या क्षेत्रांतील नवकल्पनांना प्रोत्साहन दिल्याने राज्यातील उद्योगांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमांमुळे रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढ आणि औद्योगिक विकासाला चालना मिळणार असून महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीला नवे बळ मिळेल. केंद्र शासन, महाराष्ट्र शासन आणि खाजगी उद्योग यांच्या समन्वयाने देशातील संरक्षण उत्पादन क्षमता अधिक बळकट करण्याचे राज्य शासनाचे उद्दिष्ट्य आहे. संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेचा राष्ट्रीय दृष्टिकोन लक्षात घेऊन उद्योजकांनी संरक्षण उत्पादनात महत्त्वपूर्ण योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यशाळेत श्री. कोपर्डीकर, श्री. धारिया व ब्रिगेडियर विरेश यांनी घटक-स्तरीय उत्पादन नवसंशोधन आणि स्वदेशीकरण यांना चालना देणाऱ्या धोरणांवर चर्चा केली. तसेच केंद्र व राज्य शासनातील समन्वय, प्रादेशिक पायाभूत सुविधांचा विस्तार आणि उद्योग क्षेत्रातील संधी यावरही विचारमंथन करण्यात आले.

या परिषदेला पुणे विभागातील संरक्षण क्षेत्राशी संबंधित उद्योग, घटक उत्पादक आणि इतर भागधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा

पुणे (दै. संध्या) : लष्करी गणवेश शिवण्याच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी टेलरिंग व्यावसायिकाची पाच लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध लष्कर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका टेलरिंग व्यावसायिकाने लष्कर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण टेलरिंग व्यावसायिक आहे. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. लष्कराच्या दक्षिण मुख्यालयातील अधिकारी असल्याची बतावणी चोरट्यांनी त्यांच्याकडे केली. लष्कराच्या वैद्यकीय महाविद्यालयातील अधिकाऱ्यांसाठी ४१ ब्लेझर सूट (गणवेश) शिवायचे आहेत, अशी बतावणी चोरट्यांनी त्यांच्याकडे केली. त्यानंतर चोरट्यांनी त्यांना जाळ्यात ओढले. गणवेश शिवण्याच्या कामात चांगले पैसे मिळतील. सुरुवातीला काही अनामत रक्कम भरावी लागेल, अशी बतावणी चोरट्यांनी केली. त्यानंतर चोरट्यांनी त्यांना काही पैसे जमा करण्यास सांगितले. तरुणाने ऑनलाइन पद्धतीने चोरट्यांच्या खात्यात पाच लाख पाच हजार रुपये जमा केले.

# अशी असेल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

**राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेस राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज माफ करण्यात येणार असून जमीन धारणेचा कोणताही निकष लागू राहणार नसल्यामुळे ही कर्जमाफी योजना शेतकऱ्यांसाठी मोठी फायदेशीर ठरणार असून ती नेमकी कशी असेल याचा मुद्देनिहाय आढावा...!!**



योजनेचे तीन प्रमुख घटक

या योजनेत कर्जमुक्ती, एकवेळ समझोता (वन टाईम सेटलमेंट) आणि प्रोत्साहनपर लाभ असे तीन स्वतंत्र घटक आहेत. त्यामुळे थकीत कर्जदार शेतकऱ्यांसह नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही लाभ मिळणार आहे.

**कोणाला मिळणार दोन लाखांपर्यंत कर्जमाफी**

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकबाकी असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली रक्कम मुद्दल व व्याजासह दोन लाख रुपयांपर्यंत असल्यास ती संपूर्ण रक्कम माफ केली जाईल. एका किंवा अनेक बँकांमधील एकत्रित थकबाकीचा विचार केला जाणार आहे.

**दोन लाखांपेक्षा जास्त कर्जदार शेतकऱ्यांसाठी**

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांनी दोन लाखांवरील रक्कम बँकेत जमा करणे आवश्यक राहील. ही रक्कम भरल्यानंतर त्यांना दोन लाख रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळेल. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्यांनाही लाभ**

पीक कर्जाची वेळेत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत वेळेत कर्जफेड केलेल्या पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

**पूर्वी लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही संधी**

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ चा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनी नंतर घेतलेल्या कर्जाची थकबाकी ५० हजार रुपयांपर्यंत असल्यास त्यांनाही या नव्या योजनेअंतर्गत लाभ मिळू शकतो.

**कोण ठरणार अपात्र**

राजकीय पदाधिकारी, सरकारी कर्मचारी, आयकर भरणारे व्यक्ती, तसेच सहकारी संस्थांमधील २५ हजार रुपयांपेक्षा अधिक वेतन घेणारे अधिकारी व कर्मचारी या योजनेसाठी पात्र राहणार नाहीत.

**या बँकाचा असेल समावेश**

राष्ट्रीयकृत, खाजगी, प्रादेशिक ग्रामीण, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांकडून घेतलेल्या पात्र कर्जांचाही या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

**आधार प्रमाणीकरण व ॲग्रीस्टॅक नोंदणी बंधनकारक**

योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण करण्यात येणार असून ॲग्रीस्टॅक मंचावर नोंदणी करणे आवश्यक राहील. यासाठी स्वतंत्र आणि अद्ययावत ऑनलाइन पोर्टल विकसित करण्यात येणार आहे.

**लाखो शेतकऱ्यांना मिळणार दिलासा**

कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा देतानाच नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचा दुहेरी उद्देश या योजनेत दिसून येतो. त्यामुळे राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार मिळणार असून कृषी क्षेत्राला नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**संकलन -जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

## थोडक्यात पण महत्वाचे...




### ब्रिटिश कौन्सिलकडून विद्यार्थ्यांसाठी स्टडी यूके प्री-डिपार्चर ब्रीफिंगचे आयोजन

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : ब्रिटिश कौन्सिलने यूकेमध्ये उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी 'स्टडी यूके प्री-डिपार्चर ब्रीफिंग' या विशेष ऑनलाइन मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले आहे. हे सत्र १६ जुलै २०२६ रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत (भारतीय प्रमाणवेळेनुसार) होणार असून, यूकेमधील विद्यापीठांकडून २०२६ च्या ऑटम किंवा विंटर सत्रासाठी प्रवेशपत्र मिळालेल्या विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या ऑनलाइन मार्गदर्शन सत्रामध्ये विद्यार्थ्यांना यूकेमधील शिक्षण आणि दैनंदिन जीवनाशी सहज जुळवून घेण्यासाठी आवश्यक माहिती दिली जाणार आहे. व्हिसा अर्ज प्रक्रिया, निवास व्यवस्था, प्रवासाची तयारी, आरोग्य सेवा, सुरक्षितता, मानसिक आरोग्य, आर्थिक नियोजन आणि विद्यार्थी जीवनाविषयी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाईल. यावेळी यूके व्हिसा अँड इमिग्रेशन, ब्रिटिश विद्यापीठांच्या आंतरराष्ट्रीय समन्वय संस्थेचे प्रतिनिधी, तसेच यूकेमधील माजी विद्यार्थी आणि सध्या शिक्षण घेत असलेले विद्यार्थी सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देतील. त्यांच्या अनुभवातून यूकेमधील शिक्षण आणि जीवनशैलीबाबत उपयुक्त माहिती विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

### एसअँडपी ग्लोबल रेटिंग्सकडून भारती एअरटेलला 'बीबीबी+' रेटिंग

■ कंपनीच्या मजबूत आर्थिक कामगिरी आणि विकास क्षमतेवर जागतिक स्तरावर शिक्कामोर्तब

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : भारतातील आघाडीची दूरसंचार सेवा प्रदाता कंपनी भारती एअरटेल लिमिटेडला जागतिक क्रेडिट रेटिंग एजन्सी एसअँडपी ग्लोबल रेटिंग्सकडून मोठा विश्वासाचा दाखला मिळाला आहे. एजन्सीने कंपनीचे दीर्घकालीन इश्युअर क्रेडिट रेटिंग 'बीबीबी' वरून 'बीबीबी+' असे वाढवले असून स्टेबल आउटलुक कायम ठेवला आहे. हा बदल २४ जून २०२६ पासून लागू झाला आहे. यासोबतच कंपनीच्या सिनियर अनसिक्योर्ड डेट (बिना हमी वरिष्ठ कर्ज) वरील रेटिंग देखील 'बीबीबी' वरून 'बीबीबी+' करण्यात आले आहे. ही रेटिंग वाढ भारती एअरटेलच्या सातत्यपूर्ण महसूल वाढ, मजबूत रोख प्रवाह (कॅश फ्लो), शिस्तबद्ध आर्थिक व्यवस्थापन आणि भारत तसेच आफ्रिका येथील व्यवसायातील उत्कृष्ट कामगिरीचे द्योतक आहे. यामुळे कंपनीची दीर्घकालीन वाढ टिकवून ठेवण्याची क्षमता आणि आर्थिक स्थैर्य अधिक मजबूत असल्याचे स्पष्ट झाले आहे. एसअँडपी ग्लोबलच्या अंदाजानुसार पुढील काही वर्षांत भारती एअरटेलची वाढ अधिक मजबूत राहणार आहे. कंपनीच्या ग्राहक संख्येत दरवर्षी ३ ते ४ टक्के वाढ होण्याची शक्यता आहे, तर ॲव्हरेज रेव्हेन्यू पर यूजर (एआरपीयू) मध्ये ५ ते ७ टक्के वाढ अपेक्षित आहे. वाढती ग्राहक खर्च क्षमता आणि प्रीमियम सेवांचा वाढता वापर यामुळे हा सकारात्मक परिणाम दिसून येणार आहे. कंपनीच्या आफ्रिका व्यवसायाने देखील उल्लेखनीय कामगिरी केली असून ते भविष्यातील महत्त्वाचे ग्रोथ इंजिन ठरणार आहे. आफ्रिकेतील ग्राहक संख्या दरवर्षी ९ ते ११ टक्के वाढेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

### 'लक्ष्मी निवास'च्या भावनिक कथानकाने अक्षिता मुद्गलही झाली भावूक



मुंबई (दैनिक संध्या) : झी टीव्हीवरील लोकप्रिय कौटुंबिक मालिका 'लक्ष्मी निवास' सध्या भावनिक वळणावर आली असून, राधिकाच्या आयुष्यातील संघर्षमय प्रवासाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. या भूमिकेला साकारताना अभिनेत्री अक्षिता मुद्गल हिलाही भावनिक ताणाचा अनुभव आला असून, अनेकदा शूटिंग संपल्यानंतरही त्या भावनांतून बाहेर पडणे कठीण जात असल्याचे तिने सांगितले. मालिकेच्या अलीकडील भागांमध्ये राधिकाच्या लग्नावर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, समाजाकडून तिच्या कुटुंबाला टोमणे सहन करावे लागणे आणि त्यामुळे तिच्यावर आलेला मानसिक ताण अशा अनेक घडामोडी दाखविण्यात आल्या आहेत. या प्रसंगांमुळे राधिका स्वतःच्या आयुष्याविषयी आणि नातेसंबंधांविषयी प्रश्न विचारू लागते.

# मृत्यू नंतर सुद्धा होते अंत्ययात्रेची हेळसांड

## रेल्वे लाईनवरुन नेली जाते अंत्ययात्रा



लोणी काळभोर (दै. संध्या) :

माणसाला जिवंत असताना अनेक संकटाचा सामना करावा लागत आहे परंतु मृत्यू नंतर सुद्धा त्यांच्या अत्यंयात्रेची हेळसांड पुढारी म्हणून घेणाऱ्यांमुळे होत असल्याची घटना लोणी काळभोर येथे घडत आहे .याबाबत खासदार ,आमदार व ग्रामपंचायतीचे पुर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे .

लोणी काळभोर येथील पुणे - सोलापूर रेल्वे लाईनच्या पलीकडे साधारण पाच ते सात हजार लोकसंख्या असुन दळणवळणासाठी त्यांना पाच किलोमीटर लांबुन म्हणजे थेऊरफाटा येथुन यावे लागते .हा वळसा वाचविण्यासाठी माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील यांनी खासदार असताना या रस्त्याची पाहणी करून रेल्वे लाईन मधुन जाणाऱ्या मोरीची (छोटा भुयारी मार्ग ) दुरुस्ती करून दिली होती . त्यामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला होता .पण या मोरीच्याशेजारील शेतकऱ्यांनी जागा न दिल्याने ती आता बंद अवस्थेत आहे . त्यानंतर स्थानिक नागरिकांनी रेल्वे अधिकाऱ्यांना निवेदन देऊन नवीन रेल्वे भुयारी मार्ग करण्यासाठी रितसर मागणी केली.

त्या मागणीचा विचार करून रेल्वे खात्याने जुन्या भुयारी मार्गाच्या जवळ नवीन भुयारी मार्ग करण्याची परवानगी दिली. त्यानंतर काम पण चालू केले रेल्वेचा मेगाब्लॉक पण घेतला रेल्वे रुळ कट पण करण्यात आले . त्याक्षणी नागरिकांना अतिशय आनंद झाला परंतु क्षणात नागरिकांच्या आनंदावर पाणी पडले आणि रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी हे काम थांबवले .लगेच नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली की एका पुढाऱ्याने हे काम थांबविण्यासाठी प्रयत्न केला.त्यानंतर स्थानिक नागरिकांनी खासदार डॉ .अमोल कोल्हे ,आमदार माऊली कटके व रेल्वे अधिकाऱ्यांशी पत्र व्यवहार केला .पंरतु पुढारी म्हणून घेणाऱ्यांनी सतत अडथळे आणुन हे काम थांबवले असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे .मग आम्ही लोकसभा व विधानसभा निवडणुकीत या पुढाऱ्याला मतदान केले नसुन खासदार डॉ .अमोल कोल्हे व आमदार माऊली कटके यांना मतदान केले आहे . मग जनतेचे प्रश्न सोडवण्याऐवजी अडथळे निर्माण करीत हे पुढारी खासदार व आमदारांच्या पण पुढे गेले आहेत का असा उपरोधिक सवाल स्थानिक नागरिकांनी केला आहे. हा नवीन भुयारी मार्ग होण्यासाठी शेतकरी तयार झाले असुन केवळ राजकीय परिस्थितीमुळे हे काम बंद आहे . त्यामुळे रेल्वे लाईनच्या पलीकडील शेतकऱ्यांना चार ते पाच किलोमीटरचा वळसा घालून ये जा करावी लागत आहे . त्यातच शेतकरी ,रुग्ण व विद्यार्थी यांना मोठा वळसा घालून यावे लागत असुन एखाद्या व्यक्तीचे निधन झाले तर अंत्ययात्रा नेताना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे गांभीर्याने पहावे असे नागरिकांनी सांगितले.

> रेल्वे लाईनच्या पलीकडे येताना व जाताना नागरिकांना खुपच लांबुन यावे लागत असून खासदार व आमदारांना पत्राद्वारे भुयारी मार्गाबाबत विनंती देखील केली आहे .परंतु कुणीही दाद दिली नाही. भुयारी मार्गाचा प्रश्न येत्या महिन्यात सोडवला नाही तर १५ ऑगस्टला नागरिकांबरोबर जिल्हाधिकारी पुणे येथील कार्यालया समोर उपोषण करण्यात येईल.
>
> **- सविता नितीन जगताप**
> **माजी उपसरपंच**
> **लोणी काळभोर**

## 'वनप्लस कॅम्पस डॉमिनेट २०२६'ची पुण्यातून सुरुवात

### १६ विद्यापीठांत ई-स्पोर्ट्स स्पर्धेची रंगणार मेजवानी




पुणे (दै. संध्या) :

जागतिक तंत्रज्ञान ब्रँड वनप्लसने देशभरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या 'वनप्लस कॅम्पस डॉमिनेट २०२६' या ई-स्पोर्ट्स स्पर्धेच्या तिसऱ्या आवृत्तीची घोषणा केली आहे. सात शहरांतील १६ विद्यापीठांमध्ये होणाऱ्या या स्पर्धेची सुरुवात २९ जून रोजी पुण्यातून होणार असून, पुढील दोन महिन्यांत हैदराबाद, बेंगळुरू, जयपूर, चंदीगड, नवी दिल्ली आणि नोएडा येथेही सामने रंगणार आहेत.

या स्पर्धेत देशभरातील एक लाखांहून अधिक विद्यार्थी आणि ५० पेक्षा जास्त गेमिंग क्रिएटर्स सहभागी होण्याची अपेक्षा आहे. 'वनप्लस गेमिंग ट्रक'च्या माध्यमातून प्रत्येक महाविद्यालयीन परिसरात दोन दिवसांसाठी अत्याधुनिक गेमिंग झोन उभारण्यात येणार आहे. यामध्ये स्पर्धात्मक सामने, नवीन उत्पादनांचा प्रत्यक्ष अनुभव, प्रसिद्ध गेमिंग क्रिएटर्सशी संवाद आणि विविध सहभागात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

स्पर्धेचे प्रमुख आकर्षण असलेल्या 'बीजीएमआय टीम डेथ मॅच'मध्ये महाविद्यालयीन संघ आपल्या कॅम्पसचे विजेतेपद मिळवण्यासाठी पात्रता फेऱ्यांमध्ये भिडतील. प्रत्येक विद्यापीठातील विजेता संघ ऑगस्ट महिन्यात नवी दिल्ली येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरेल. अंतिम फेरीत १० लाख रुपयांच्या बक्षीस रकमेसाठी चुरशीची लढत होणार असून, सर्व सामने 'वनप्लस नॉर्ड ६' या स्मार्टफोनवर खेळविण्यात येणार आहेत.

महाविद्यालयीन स्तरावर स्पर्धात्मक गेमिंगला प्रोत्साहन देणे आणि नवोदित ई-स्पोर्ट्स खेळाडूंना राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

**पुणेतील वेळापत्रक**
**२९ ते ३० जून : जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट**
**१ ते २ जुलै : सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट**

२९ जूनपासून सुरू होणाऱ्या पुणे टप्प्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, इच्छुक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### वटपौर्णिमेनिमित्त कलर्स मराठीवर 'मी जिंकून घेईन सारं' आणि 'मोहिनी'चा विशेष महासंगम




पुणे (दै. संध्या) : वटपौर्णिमेच्या निमित्ताने कलर्स मराठीवरील लोकप्रिय मालिका 'मी जिंकून घेईन सारं' आणि 'मोहिनी – प्रेमाची फिल्मी कहाणी' यांचा विशेष 'वटपौर्णिमा महासंगम' २९ जून ते १ जुलै दरम्यान सलग तीन दिवस संध्याकाळी ७ वाजता प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सणाचा उत्साह, कौटुंबिक नाती, रहस्य, थरार आणि भावनिक घडामोडींचा संगम या विशेष भागांमध्ये अनुभवायला मिळणार आहे.

## नव्या मालिकेतील दोन दूरध्वनी संचांच्या विक्रीला प्रारंभ




मुंबई (दै. संध्या) :

कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित दूरध्वनी संच निर्मिती करणाऱ्या 'एआय प्लस' कंपनीने आपल्या नव्या 'नोव्हा २' मालिकेतील नोव्हा २ प्रो आणि नोव्हा २ निओ या दोन दूरध्वनी संचांच्या विक्रीला शुक्रवार (२६ जून)पासून प्रारंभ केला आहे. प्रथमच दूरध्वनी संच वापरणाऱ्या ग्राहकांपासून ते अधिक क्षमतेचा अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या वापरकर्त्यांपर्यंत सर्वांच्या गरजा लक्षात घेऊन हे संच तयार करण्यात आले आहेत. हे दोन्ही संच शुक्रवारपासून दुपारी बारा वाजल्यापासून 'फ्लिपकार्ट' आणि निवडक विक्री केंद्रांवर उपलब्ध झाले आहेत. 'नोव्हा' मालिकेला ग्राहकांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर कंपनीने या दोन नव्या संचांची भर घातली आहे. विक्रीच्या पहिल्या दिवशी नोव्हा २ निओच्या ४ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची किंमत १२ हजार ९९९ रुपये, तर ६ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची किंमत १३ हजार ९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. नोव्हा २ प्रोच्या ६ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची सुरुवातीची किंमत १४ हजार ९९९ रुपये, तर ८ जीबी स्मरणक्षमता व १२८ जीबी संचयन क्षमतेच्या प्रकाराची किंमत १६ हजार ९९९ रुपये आहे. सर्व बँकांच्या धनादेश व पतपत्रांवर एक हजार रुपयांची सवलतही देण्यात आली आहे. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा 'नेक्स्टक्वांटम शिफ्ट टेक्नॉलॉजीज'चे संस्थापक माधव शेठ यांनी सांगितले की, सक्षम, आकर्षक आणि विश्वासार्ह दूरध्वनी संच अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने ही मालिका सादर करण्यात आली आहे. कार्यक्षमता, बॅटरीचा दीर्घकालीन वापर, छायाचित्रण, दर्जेदार प्रणाली आणि वापरकर्त्यांच्या गोपनीयतेवर विशेष भर देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. नोव्हा २ निओमध्ये 'मीडियाटेक डायमेन्सिटी ६३००' पाचव्या पिढीच्या जाळ्याला अनुरूप प्रक्रिया संच, १२० हर्ट्झ पुनर्ताजगी दरासह ६.७४५ इंच उच्च स्पष्टतेचा पडदा, 'अँड्रॉइड १६' आधारित कार्यप्रणाली, ४८ मेगापिक्सेलचा मुख्य कॅमेरा, ८ मेगापिक्सेलचा समोरील कॅमेरा, ६००० एमएएच क्षमतेची बॅटरी, बाजूला बसविलेला बोटांच्या ठशावर चालणारा कुलूपमुक्ती पर्याय, धूळ व पाण्यापासून संरक्षण, दोन टेराबाइटपर्यंत वाढविता येणारी संचयन क्षमता आणि सडपातळ रचना देण्यात आली आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे पादीरवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे आणि आसपासच्या परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमीन ही श्री. सचिन दत्तात्रय वाळूज रा. पादीरवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे यांची खरेदीची, प्रत्यक्षात मालकीहक्क ताबे वहिवाटीची व निजोखामी सामाईक शेतजमीन आहे. सदर शेतजमीन ही गहाण, दान, लीज, बक्षीस, दावा, कुळ, खंड, पोटगी, साठेखत, खरेदीखत, इ. नसलेली, तसेच सदर शेतजमीनी संदर्भात कोणत्याही कोर्टात वाद प्रलंबित नसून सदर शेतजमिनीवर कोणत्याही प्रकारचा मनाई हुकुम नाही. तसेच सदरची शेतजमीन ही निर्वेध व बोजारहीत असल्याची शेतजमीन मालक श्री. सचिन दत्तात्रय वाळूज यांनी आमचे आशिलांस खात्री व भरवसा दिलेला आहे. सदर शेतजमीनीपैकी त्यांचे हिश्याचे ००हे १८.५ आर हे संपूर्ण क्षेत्र आमचे अशिलांनी खरेदी घेण्याचे निश्चित केलेले आहे. तरी सदर शेतजमिनीचे संदर्भात कोणताही कायदेशीर हक्क अथवा हितसंबंध, साठेखत, गहाण खत, खरेदीखत, बक्षीसपत्र, करार, विसारपावती, दान, लीज, पोटगी, चोळी-बांगडी, कोर्ट दावे, मनाई हुकुम, ताबा, कुळ, खंड, वहिवाट, वारसहक्क, व इतर कोणत्याही प्रकारचा हित संबंध अथवा हरकत असल्यास, सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसांचे आत समक्ष, लेखी व मूळ कागदपत्रे सोबत घेवून आमचे कार्यालयाशी संपर्क साधावयाचा असून त्याबाबत आमची खात्री पटवून द्यावयाची आहे तथा खातरजमा करून द्यावयाची आहे. वरील मुदतीत कोणाचीही, कोणतीही लेखी हरकत न आल्यास सदर शेतजमिनीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही, असल्यास तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल. तसेच सदरची शेतजमीन ही निर्वेध, निजोखामी व बोजारहीत आहे असे समजून आमचे आशिल सदर शेतजमिनीचे संदर्भात कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कुणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. याची माहिती तमाम जनतेस व्हावी म्हणून सदरची जाहीर नोटीस पेपरमध्ये प्रसिद्ध करीत आहे.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** : तु.व जि.प. पुणे, पो. तु.व पं.स. जुन्नर, मे. दुय्यम नि. सो. नारायणगाव/जुन्नर, यांचे हद्दीतील गाव मौजे पादीरवाडी, ता. जुन्नर जि. पुणे येथील खाते नं. ६७१ वरील शेतजमीन सव्हे. / गट नं. १२४ यांसी क्षेत्र ०० हे ३७.०० आर, यांसी आकार-००रु.५९ पैसे, यापैकी क्षेत्र ००हे. १८.५ आर, यांसी आकार००रु.३० पैसे येणेप्रमाणे वहि वाटीच्या सर्व हक्कासह तसेच विहिरी मधील भांडे पाणी वापराचे हक्कासह, जाणे-येणेच्या हक्कासह तसेच पाईपलाईन व मोटार विद्युत कनेक्शनसह अशी दरोबस्त शेतजमीन.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

स्थळ :- नारायणगाव.
दि. २६/०६/२०२६

**- खरेदीदार करिता -**
**ॲड. सुभाष सिताराम भिसे**
**ऑफिस : साईप्रसाद बिल्डिंग, शॉप नं. १, अमृत सुपर शॉपी समोर, कोल्हेमळा रोड, नारायणगाव, ता.जुन्नर, जि. पुणे.४१०५०४**

# 'इमर्जंट'चे १ कोटी रुपयांचे आव्हान






पुणे (दै. संध्या) :

व्यवसाय मालक आणि संस्थापक एआयचा वापर करून वास्तविक परिचालन समस्यांसाठी सॉफ्टवेअर तयार करतील, ज्यात सर्वात प्रभावी व्यवसाय परिवर्तन एकूण 1 कोटी रुपयांच्या बक्षीसासाठी स्पर्धा करतील

वेगाने वाढणारा एआय सॉफ्टवेअर निर्मिती मंच इमर्जंटने उद्योजक आणि कंटेंट क्रिएटर राज शमानी यांच्याशी भागीदारी केली असून भारतीय व्यवसायांना स्वतःच्या कामकाजाशी सुसंगत सॉफ्टवेअर तयार करून एआय-नेटिव्ह बनण्यास मदत करण्याच्या उद्देशाने देशव्यापी आव्हान लॉन्च करण्यात आले.

हा उपक्रम भारतभरातील व्यवसाय मालक, संस्थापक आणि ऑपरेटरना त्यांच्या व्यवसायातील वास्तविक समस्या ओळखण्यासाठी, इमर्जंट वापरून सॉफ्टवेअर सोल्यूशन तयार करण्यासाठी, दैनंदिन कामकाजात त्याचा वापर करण्यासाठी आणि प्रभाव दर्शविण्यासाठी आमंत्रित करतो. पहिल्या तीन व्यावसायिक परिवर्तनांना राज शमानी आणि इमर्जंटकडून एकत्रित तब्बल 1 कोटी रुपयांचे बक्षीस देण्यात येईल. भारतामधील व्यवसाय वाढीची पुढची लाट केवळ स्टार्टअप्सकडूनच नव्हे तर विद्यमान व्यवसायांनी ते करत असलेले काम सुधारण्यासाठी सॉफ्टवेअर आणि एआयचा अवलंब केल्याने येईल, या वाढत्या विश्वासावर हे आव्हान तयार करण्यात आले आहे. उत्पादक, व्यापारी, लॉजिस्टिक कंपन्या, सप्लाय-चेन ऑपरेटर, D2C ब्रँड आणि कुटुंबाद्वारे चालवले जाणारे उद्योग अनेकदा खंडित प्रणाली आणि हस्तलिखित प्रक्रियांवर अवलंबून असतात. कारण सानुकूल सॉफ्टवेअर तयार करणे पारंपरिकरित्या महाग, वेळखाऊ आणि तांत्रिक कौशल्यावर अवलंबून आहे. इमर्जंटच्या माध्यमातून, व्यवसाय मालक नैसर्गिक भाषेचा वापर करून फूल-स्टॅक सॉफ्टवेअरमार्फत तयार करू शकतात. ज्यामुळे त्यांना पारंपरिक सॉफ्टवेअर विकास चक्रांशिवाय इन्व्हेंटरी व्यवस्थापन, लीड ट्रॅकिंग, वर्कफ्लो ऑटोमेशन, ऑर्डर व्यवस्थापन आणि ऑपरेशनल दृश्यमानता यासाठी साधने तयार करता येतात. उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या स्वीकारावर उद्योजक तसेच निर्माते कशाप्रकारे प्रभाव पाडत आहेत यामधील व्यापक बदल देखील या उपक्रमातून प्रतिबिंबित होतो. केवळ एआय साधनांशी प्रेक्षकांची ओळख करून देण्याऐवजी, ही मोहीम व्यवसाय मालकांना त्यांच्या स्वतःच्या कार्यात उपाय तयार करण्यास आणि तैनात करण्यास प्रोत्साहित करते. वास्तविक व्यावसायिक आव्हाने सोडवण्याच्या दृष्टीने एआय कसे लागू होऊ शकते याची व्यावहारिक उदाहरणे तयार करते.

इमर्जंटचे सह-संस्थापक आणि सीईओ मुकुंद झा म्हणाले, "बहुतेक व्यवसायांना अधिक सॉफ्टवेअरची आवश्यकता नसते. त्यांचा व्यवसाय प्रत्यक्षात कसा चालतो हे प्रतिबिंबित करणाऱ्या सॉफ्टवेअरची गरज आहे. आतापर्यंत, बांधणीसाठी वेळ, पैसा आणि तांत्रिक स्रोतांची आवश्यकता होती; त्याची कमतरता अनेक व्यवसायांना भासायची. एआयमुळे त्यात बदल झाला. आम्हाला हे दाखवायचे आहे की उत्पादक, व्यापारी, लॉजिस्टिक ऑपरेटर किंवा संस्थापक आता त्यांच्या स्वतःच्या व्यवसायाभोवती साधने तयार करू शकतात आणि त्याचे परिणाम काही दिवसांतच दिसू शकतात, त्याकरिता अनेक महिने वाट पाहावी लागत नाही."

मोहिमेचा एक भाग म्हणून, राज शमानी यांनी इमर्जंटचा वापर करून स्वतःच्या व्यवसायासाठी एआयच्या माध्यमातून वास्तविक सॉफ्टवेअर तयार केले, प्रक्रियेचे दस्तऐवजीकरण केले आणि भारतीय व्यवसाय मालकांना दाखवून दिले की अशा सॉफ्टवेअरची निर्मिती आता केवळ डेव्हलपर किंवा मोठ्या कंपन्यांपुरते मर्यादित नाही.

## मिथक की सत्य : बदामांमुळे शरीरात उष्णता वाढते का?



नवी दिल्ली (दै. संध्या) :

बदाम हे दीर्घकाळापासून दैनंदिन आहाराचा एक लोकप्रिय भाग राहिले आहेत, जे जेवणांमध्ये पौष्टिक घटक म्हणून आनंदाने खाल्ले जातात, नाश्त्याच्या दिनचर्येत समाविष्ट केले जातात किंवा गोड तसेच तिखट पदार्थांमध्ये जोडले जातात. त्यांच्या लोकप्रियतेनंतरही, विशेषतः उष्ण महिन्यांमध्ये, एक सामान्य समज पुन्हा पुन्हा पुढे येतो: बदामांमुळे शरीरात उष्णता वाढते का? अनेक लोक उन्हाळ्यात बदाम खाण्याबाबत सावध होतात, कारण त्यांना असे वाटते की त्यामुळे शरीरातील उष्णता वाढू शकते किंवा गरम हवामानात अस्वस्थता निर्माण होऊ शकते. पण ही चिंता तथ्यांवर आधारित आहे का, की ती फक्त काळाच्या ओघात टिकून राहिलेल्या अनेक अन्नविषयक गैरसमजांपैकी एक आहे? बदाम शरीरात उष्णता निर्माण करतात हा विश्वास अनेकदा अन्नपदार्थ कसे कार्य करतात यापेक्षा त्यांच्याबद्दल असलेल्या धारणांशी अधिक संबंधित असतो. बदाम पोषक तत्त्वांनी समृद्ध असून त्यामध्ये नैसर्गिकरीत्या आरोग्यदायी चरबी, प्रथिने आणि फायबर भरपूर प्रमाणात असते, त्यामुळे काही लोक त्यांना "जड" अन्न मानतात आणि त्यामुळे शरीरात उष्णता किंवा उबदारपणा जाणवू शकतो, असे गृहीत धरतात. तथापि, उष्ण ऋतूंमध्ये बदामांचे सेवन करणे अयोग्य आहे, असे सूचित करणारा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. उलट, संतुलित आहाराच्या सवयींचा भाग म्हणून विविध वयोगटांतील लोक आणि वेगवेगळ्या जीवनशैलीचा अवलंब करणारे लोक वर्षभर बदामांचा आनंदाने आस्वाद घेत राहतात. संतुलित पोषणविषयक दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून, तज्ज्ञांकडून बदामांची मोठ्या प्रमाणावर शिफारस केली जाते. मॅक्स हेल्थकेअर – नवी दिल्ली येथील डायटेटिक्स विभागाच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समद्दार स्पष्ट करतात, "आपण आपल्या सकाळीची सुरुवात ज्या पद्धतीने करतो, त्याचा आपल्या शरीराच्या दिवसभरातील कार्यक्षमतेवर सखोल परिणाम होतो.

## जाहीर नोटीस

तमाम नागरीकांस विशेषतः गाव मौजे खानापुर, ता. जुन्नर जि. पुणे येथील सर्व नागरीकांना सदरच्या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

खालील परिशिष्ठात नमुद केलेल्या मिळकती आमचे अशिलांच्या व इतर यांच्या वडिलोपार्जित मालकी हक्क ताबे वहिवाटीच्या मिळकती आहेत. अद्यापपावेतो सदर मिळकतीमध्ये कोणाचेही तोंडी अगर लेखी वाटप झालेले नाही. सदरच्या मिळकती या समाईकात मालकी हक्क असलेल्या मिळकती आहेत. सदर मिळकतींमधील काही खातेदार / सहहिस्सेदार म्हणजेच श्री. वसंत किसन भगत, श्री. बाळु किसन भगत, मंजुळा किसन भगत व जयश्री गुलाब ढवळे हे त्यांचे क्षेत्र अन्य तिहाईत इसमास विक्री करण्याच्या विचारात आहेत असे आमचे अशिलांना खात्रीलायकरीत्या समजले आहे.

कोणाचीही फसवणुक होवु नये म्हणुन आमचे अशिल श्री. नवनाथ किसन भगत रा. खानापुर (भगत मळा), ता. जुन्नर, जि. पुणे सदरची नोटीस मुद्दाहुन प्रसिध्द करीत आहेत. अन्य कोणीही तिन्हाईत इसमांनी वर नमुद केलेल्या व्यक्तींबरोबर खालील परिशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतींबाबत व्यवहार केल्यास सदर व्यक्तीस जमीनीचा कोणताही ताबा मिळणार नाही तसेच सदरचे खरेदीखत / बक्षिसपत्र हे आमचे अशिलांचे हक्कावर बंधनकारक राहणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन - तु.पुणे पो.तु. ता. जुन्नर, पं. स.जुन्नर, सब. रजि. सो. जुन्नर यांचे हद्दीतील गाव मौजे खानापुर, येथील शेत जमीनी .

| अ. क्र. | गट नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १) | १८५ | ०.०८ | ०.२८ |
| २) | १६९ | ०.०५ | ०.३१ |
| ३) | ४१३ | ०.९० | २.०३ |
| | पो.ख. | ०.०१ | |
| | एकुण | ०.९१ | |
| ४) | ३३० | ०.८१ | १.२६ |
| | पो.ख. | ०.०७ | |
| | एकुण | ०.८८ | |

येणेप्रमाणे शेतजमीन तसेच जमीनीतील झाडा-झुडुपांसह वगैरे तद्रभुत वस्तुसह व हक्कासह तसेच २ बोअरवेल सह, इले. कनेक्शन, इले. मोटार पाईप - लाईनसह तसेच सदर मिळकतींमध्ये जाणे-येणेचे वहीवाटीचे हक्कासह.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस
दि. २५/०६/२०२६

शिक्का

**ॲड. प्रफुल्ल रा. लुंकड**
**बी.कॉम., एल.एल.बी.**
**महा./१२४/१९९६**
**रा. "प्रफुल्ल", ७७ सराईपेठ,**
**जुन्नर, जि. पुणे.**
**मोबा. ९८८१६६६९९०/७५८८१८३६६६**

## थोडक्यात पण महत्वाचे...




## छत्रपती चौकातील वाहतूक कोंडी सुटणार; नगरसेविका कुंदा भिसे यांची पाहणी

■ दोन दिवसांत रस्ता मोकळा करण्याचे निर्देश

पिंपळे सौदागर (दैनिक संध्या): छत्रपती चौक, पिंपळे सौदागर येथे सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे गेल्या अनेक दिवसांपासून परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. विशेषतः जी. के. गुरुकुल शाळा सुटण्याच्या वेळेत तसेच सकाळ, दुपार व संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने नागरिकांना एक ते दोन तासांपर्यंत वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागत होते. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका डॉ. सौ. कुंदाताई संजय भिसे यांनी आज संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकारी व कंत्राटदारांशी चर्चा करून नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. रस्त्याचे बहुतांश काम पूर्ण झालेले असतानाही किरकोळ कामांसाठी संपूर्ण रस्ता बंद ठेवण्यात आल्याने वाहतूक कोंडी अधिक वाढत असल्याचे निदर्शनास आणून देत कुंदा भिसे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना किमान एक मार्ग (वन-वे) तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले. तसेच येत्या दोन दिवसांत रस्ता वाहतुकीसाठी खुला करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी स्पष्ट सूचना त्यांनी केली. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांबाबत संवेदनशील राहून त्यांचे प्रश्न तत्काळ मार्गी लावण्यासाठी पिंपरी चिंचवड भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे आणि नगरसेविका अनिता काटे यांच्या साथीने आपण कटिबद्ध असल्याचे कुंदा भिसे यांनी यावेळी सांगितले.

## पवना थेट जलवाहिनी प्रकल्पासाठी "आशेचा किरण"






■ आमदार महेश लांडगेंची मागणी अन् मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी बोलावली बैठक

■ मावळ, पिंपरी-चिंचवडमधील लोकप्रतिनिधींच्या समन्वयातून प्रकल्पाला गती

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाच्या ठरणाऱ्या पवना थेट जलवाहिनी प्रकल्पाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली दि.३ जुलै २०२६ रोजी संयुक्त बैठक होणार आहे. मावळचे आमदार सुनील शेळके यांच्यासोबत समन्वय केला असून, हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागवण्यासाठी सर्वोतोपरी पाठपुरावा करणार आहोत, अशी माहिती भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली. या महत्त्वपूर्ण बैठकीला पिंपरी-चिंचवड आणि मावळातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. पवना जलवाहिनी प्रकल्पाबाबत सध्या पिंपरी-चिंचवड शहरासह मावळ तालुक्यात विविध स्तरांवर चर्चा सुरू असून, शेतकरी, ग्रामस्थ, सामाजिक संघटना आणि लोकप्रतिनिधींमध्येही या विषयावर मतमतांतरे आहेत. मात्र, शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता पवना धरणावरील जलवाहिनी प्रकल्प आवश्यक आहे. त्यामुळे याबाबत सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांची संयुक्त बैठक व्हावी आणि प्रकल्पाला गती द्यावी, यासंदर्भात आमदार महेश लांडगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना विनंती केली होती. त्याला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. आमदार लांडगे म्हणाले की, पवना थेट जलवाहिनी प्रकल्पासाठी गेल्या अनेक वर्षांपासून विधानसभा अधिवेशनात मागणी लावून धरली आहे. मावळचे आमदार सुनील शेळके यांच्याशी चर्चा केली आहे. हा प्रकल्प सर्वांच्या सहभागाने आणि समन्वयाने पूर्ण करण्यासाठी आम्ही पाठपुरावा करीत आहोत. मुख्यमंत्री महोदय यांच्या बैठकीसाठी मावळचे खासदार श्रीरंग बारणे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, मावळचे आमदार सुनील शेळके, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, आमदार शंकर जगताप, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे आदी लोकप्रतिनिधी आणि जलसंपदा विभागाचे मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी असे प्रशासकीय अधिकारी निमंत्रित आहेत. भाजपा महायुती सरकारने वर्षभरापूर्वीच पवना थेट जलवाहिनी प्रकल्पावरील 'जैसे थे' आदेश रद्द केला आहे. त्यानंतर हा प्रकल्प मार्गी लागण्याच्या आशा निर्माण झाल्या आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनीही यापूर्वी या विषयावर सकारात्मक भूमिका घेतली असून, बैठकीसंदर्भात अनुकूलता दर्शवली आहे. शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ रोजी दुपारी ३ वाजता विधानभवन, मुंबई येथे बैठक नियोजित केली आहे.

# प्रभागातील पाणीटंचाईवर लोकप्रतिनिधी आक्रमक



**अधिकाऱ्यांची तातडीची बैठक, युद्धपातळीवर उपाययोजनांचे आदेश**

पिंपरी (दै. संध्या)

पिंपळे सौदागर-रहाटणी प्रभाग क्रमांक २८ मध्ये गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईची गंभीर दखल घेत स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रशासनाला धारेवर धरले आहे. भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे, नगरसेविका अनिता काटे आणि नगरसेविका कुंदा भिसे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत तातडीची उच्चस्तरीय बैठक घेत नागरिकांना दिलासा देण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. यंदा मान्सून उशिरा दाखल झाल्याने तसेच धरणांतील पाणीसाठा मर्यादित असल्याने शहरात पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. प्रभाग २८ मधील अनेक सोसायट्या, गृहप्रकल्प आणि वस्त्यांमध्ये कमी दाबाने व अपुरा पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींनी अधिकाऱ्यांना जाब विचारत परिस्थितीवर तात्काळ नियंत्रण मिळवण्याचे निर्देश दिले.

बैठकीत बोलताना शत्रुघ्न काटे म्हणाले, "पावसाने ओढ दिली असली तरी नागरिकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागणार नाही. प्रशासनाने योग्य नियोजन करून ज्या भागात गंभीर समस्या आहे तेथे पाण्याचा दाब वाढवावा. आवश्यकतेनुसार महापालिकेमार्फत मोफत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा." तसेच पाणी सोडण्याच्या वेळा निश्चित करणे, कमी दाबाची समस्या दूर करणे आणि वितरण व्यवस्थेतील तांत्रिक त्रुटी तातडीने दुरुस्त करण्याची मागणीही करण्यात आली.

लोकप्रतिनिधींच्या आक्रमक भूमिकेनंतर पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रभागातील जलवाहिन्यांची तपासणी करून दोष दूर करण्याचे आश्वासन दिले. अंतर्गत व्हॉल्व्ह यंत्रणेत आवश्यक बदल करून सर्व भागांना समान पाणीपुरवठा मिळेल यासाठी पुढील २४ तासांत नियोजन करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या बैठकीस पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा निरीक्षक तसेच प्रभागातील सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. नागरिकांच्या पाणीप्रश्नावर तातडीने कार्यवाही करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## वराळे गावात गायरान जमिनीच्या ताब्यावरून तणाव

वडगाव मावळ (दै. संध्या)

गुंजवणी धरण प्रकल्पगस्तांना मिळालेल्या जागेचा ताबा घेण्यासाठी पोलिस बंदोबस्तात आलेल्या ह.भ.प. चैतन्य महाराज वाडेकर यांना वराळे ग्रामस्थानी तीव्र विरोध केल्याने बुधवारी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. दरम्यान, पोलिस प्रशासन व महसूल अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपानंतर तूर्त हे प्रकरण थांबविण्यात आले. या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन मराठे, माजी सरपंच ज्ञानेश्वर मराठे, उद्योजक अतुल मराठे, सरपंच नीलेश शिंदे, उपसरपंच विशाल मराठे, प्रवीण मराठे, योगेश मराठे, अॅड. ओंकार मराठे, युवराज मराठे, अरुण मराठे, शंकरराव मराठे, बाळू शिंदे, गोरख मुकणे, संगीता मराठे, ह.भ.प. अण्णासाहेब मराठे, तुकाराम मराठे, मारुती काळे, दत्तात्रय मराठे, नीलेश मराठे आणि ग्रामस्थ उपस्थित होते. वराळे गावात सार्वजनिक वापरासाठी असलेल्या जागेच्या ताब्यावरून बुधवारी सकाळी गुंजवणी धरण प्रकल्पग्रस्त बबन बंबाजी पवार यांच्या वतीने ह.भ.प. चैतन्य महाराज वाडेकर हे पोलिस बंदोबस्तासह जागेचा ताबा घेण्यासाठी गावात दाखल झाले. मात्र, संबंधित जागा गावाच्या सार्वजनिक वापरासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगत ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला. त्यामुळे काही काळ गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. गुंजवणी धरण प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी वराळे गावातील गायरान जमिनीचा काही भाग देण्यात आला आहे.

## खा. संजय दिना पाटील यांच्या विरोधात पिंपरीत पत्रकारांचे आंदोलन

पिंपरी (दै. संध्या)




पिंपरी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षात प्रवेश केलेले संजय दीना पाटील यांनी पत्रकारांविषयी केलेल्या अवमानकारक वक्तव्याच्या निषेधार्थ पिंपरीत पत्रकारांनी बुधवारी तीव्र निषेध आंदोलन केले. यावेळी एकनाथ शिंदे यांनी संजय दिना पाटील यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी सर्व पत्रकारांनी केली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात झालेल्या या निषेध आंदोलनात गोविंद वाकडे, नंदकुमार सातुर्डेकर, अविनाश चिलेकर, संतोष मिश्रा, रोहित आठवले, बाळासाहेब ढसाळ, विजय जगताप, अनिल वडघुले यांनी यावेळी खा. संजय दिना पाटील यांचा निषेध करणारी भाषणे केली.

या आंदोलनात मिलिंद कांबळे, विजय जगताप, अमोल काकडे, नरेश नातू, सुरज कसबे, राजेश स्टीफन, अतुल मारवाडी, प्रसन्न तरडे, विकास शिंदे, भानुदास हिवराळे, सुरज कसबे, विश्वजीत पोल्ले, पराग कुंकूलोळ आदींनी सहभाग घेतला होता.

यावेळी गोविंद वाकडे म्हणाले की, संजय दिना पाटील यांचे वक्तव्य निषेधार्ह असे आहे. लोकप्रतिनिधीला ही भाषा शोभत नाही. अशा खासदाराची हकालपट्टी करून राजीनामा घ्यावा.

ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर म्हणाले की, माध्यमांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करून लोकशाहीचा गळा घोटला जात आहे. महाराष्ट्रात राजकारणात सुसंस्कृतपणा राहिला नाही. एकमेकांना शिव्या देणारे नेते आता पत्रकारांना लक्ष्य करू पाहत आहेत संजय दिना पाटील यांनी जी शिवराळ भाषा वापरली त्याहीपेक्षा अधिक टोकाची भाषा आम्हाला बोलता येते. सत्तेच्या मुजोरीतून आपण ही भाषा बोलत असाल तर पत्रकार हे खपवून घेणार नाही असा इशारा सातुर्डेकर यांनी दिला. अविनाश चिलेकर म्हणाले की, भाजप अशा वाचाळवीरांना पाठीशी घालत आहे.

संतोष मिश्रा म्हणाले की, प्रश्न विचारणे हे पत्रकारांचे काम आहे. जीवावर बेतले तरी आम्ही आमचे हे कर्तव्य पार पाडत राहू संजय दिना पाटील यांच्या धमकीला भीक घालणार नाही.

बाळासाहेब ढसाळ म्हणाले की, सत्ताधाऱ्यांना झोडून काढले तरच ते वटणीवर येतील. यावेळी खा. संजय दिना पाटील यांच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या.

## कासारवाडीतील PCMC शाळेची जगातील Top 10 शाळांमध्ये निवड

### World's Best School Prizes 2026 मध्ये जागतिक मान्यता

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कासारवाडी येथील PCMC छत्रपती शाहूजी महाराज इंग्लिश मीडियम स्कूलची UKस्थित T4 Education संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित World's Best School Prizes 2026 मध्ये Innovation (नवोपक्रम) श्रेणीत जगातील Top 10 शाळांमध्ये निवड झाली आहे. सरकारी शाळांमधील गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि वाचन संस्कृतीसाठी हा मोठा सन्मान मानला जात आहे.

शाळेने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी राबवलेल्या उपक्रमांची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली. विद्यार्थ्यांना आवडीची पुस्तके निवडण्याचे स्वातंत्र्य, समृद्ध ग्रंथालय आणि वाचन चळवळ समुदायापर्यंत पोहोचविण्याच्या प्रयत्नांमुळे हा मान मिळाला.




गेल्या तीन वर्षांत ग्रंथालयातील पुस्तकांची संख्या १,००० वरून ४,००० हून अधिक करण्यात आली. शाळेत दररोज वाचन तास सुरू करण्यात आला असून १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी स्वतःची पुस्तके लिहून प्रकाशित केली आहेत. शाळेचा वार्षिक साहित्य महोत्सव 'कथाकार' हजारो विद्यार्थी, पालक आणि साहित्यप्रेमींना एकत्र आणत आहे. 'पुस्तकांचे गाव' या संकल्पनेमुळे कासारवाडी परिसरात वाचन संस्कृतीला चालना मिळाली असून अनेक कुटुंबांनी घरगुती ग्रंथालये उभारण्यास सुरुवात केली आहे.

महापालिका आणि आकांक्षा फाउंडेशन यांच्या भागीदारीत विकसित झालेले हे वाचन मॉडेल आज ५० हून अधिक PCMC शाळांमध्ये राबवले जात आहे. या उपक्रमांतर्गत १.३८ लाख पुस्तके, ६७७ ग्रंथालय कपाटे, २० हजारांहून अधिक विद्यार्थी, ५०० शिक्षक आणि ५० मुख्याध्यापक या चळवळीशी जोडले गेले आहेत.

शाळेचे मुख्याध्यापक परिजात प्रकाश म्हणाले, "प्रत्येक मुलाला पुस्तकांवर प्रेम करण्याची संधी मिळावी, हा आमचा उद्देश होता. हा सन्मान विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि संपूर्ण कासारवाडी समुदायाचा आहे."

या यशानिमित्त आचार्य अत्रे रंगमंदिर, पिंपरी येथे विशेष कार्यक्रमात विद्यार्थी, पालक, शिक्षक, लोकप्रतिनिधी, आकांक्षा फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौरभ तनेजा तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत जागतिक यशाचा उत्सव साजरा करण्यात आला.

सरकारी शाळांमधील गुणवत्तापूर्ण शिक्षण, वाचन संस्कृती आणि समुदाय सहभागाला मिळालेली ही जागतिक मान्यता असून या यशामुळे पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र आणि भारताचे नाव जागतिक स्तरावर अभिमानाने झळकले आहे.

## शालेय शिक्षकांच्या खासगी शिकवणीला चाप

**नियमभंग करणाऱ्या शिक्षकांवर होणार कारवाई**

तळेगाव दाभाडे (दै. संध्या)



शाळेतील शिक्षकांकडून घेतल्या जाणाऱ्या बेकायदेशीर खासगी शिकवणीबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी तळेगाव शहर युवक काँग्रेसच्या वतीने तळेगाव दाभाडे नगर परिषदेचे मुख्याधिकारी गिरीश दापकेकर यांच्याकडे केली होती. त्या अनुषंगाने नगर परिषद शिक्षण मंडळ तळेगाव दाभाडे यांच्या वतीने नगर परिषद शाळा, खासगी, अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक शाळा यांच्या नावे शासन निर्णय काढण्यात आला आहे. शासकीय व अनुदानित शाळांतील कोणत्याही शिक्षकास खाजगी शिकवणी किंवा खासगी अध्यापन करण्यास मनाई करण्यात आली आहे. सर्व शिक्षकांकडून 'मी कोणत्याही प्रकारची खासगी शिकवणी घेत नाही' याबाबत लेखी घोषणा/ हमीपत्र घेण्यात यावे.

शाळेतील विद्यार्थ्यांना किंवा पालकांना विशिष्ट खासगी शिकवणीबाबत कोणत्याही प्रकारची सक्ती अथवा शिफारस करण्यात येऊ नये. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक अडचणी दूर करण्यासाठी शाळा स्तरावर अतिरिक्त मार्गदर्शन वर्ग किंवा अभ्यासपूरक उपक्रम राबविण्यात यावेत. कोणत्याही विद्यार्थ्यास खासगी शिकवणीसाठी प्रवृत्त करणे, सक्ती करणे किंवा प्रलोभन देणे यास सक्त मनाई असल्याबाबत सूचना द्याव्यात.

## आणीबाणीच्या ५१ व्या वर्षानिमित्त पिंपरीत भाजपचा 'महासंकल्प'

पिंपरी (दै. संध्या)

२५ जून १९७५ रोजी देशात लागू करण्यात आलेल्या आणीबाणीला ५१ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर, भारतीय लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या आणि संविधानाचा अपमान करणाऱ्या काँग्रेस पक्षाचा काळा इतिहास समोर आणण्यासाठी पिंपरी येथे भाजप युवा मोर्चातर्फे 'युवा संकल्प सभे'चे आयोजन करण्यात आले होते. पिंपरी चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ पार पडलेल्या या कार्यक्रमात भाजपच्या युवा कार्यकर्त्यांनी लोकशाही रक्षणाचा महासंकल्प केला. भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी आणीबाणीच्या काळातील जुलमी राजवटीचा भाजप पदाधिकारी, युवा कार्यकर्ते आणि नागरिकांनी तीव्र निषेध केला. युवा कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना शहराध्यक्ष श्री. शत्रुघ्न (बापू) काटे यांनी काँग्रेसवर घणाघाती टीका केली. ते म्हणाले,



**काँग्रेसच्या काळ्या इतिहासाचा निषेध**


"२५ जून १९७५ हा भारताच्या इतिहासातील सर्वात काळा दिवस आहे. तत्कालीन काँग्रेस सरकारने स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी संपूर्ण देशात आणीबाणी लादली, लाखो देशभक्तांना तुरुंगात डांबले आणि प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. ज्या काँग्रेसने लोकशाही संपवण्याचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचा अपमान करण्याचे पाप केले, त्यांचा खरा चेहरा आजच्या युवा पिढीसमोर आणि सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे." या कार्यक्रमात आणीबाणीच्या काळात लोकशाही पुनरुज्जीवनासाठी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या व कडक तुरुंगवास सोसणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना आणि देशभक्तांना मनोभावे नमन करण्यात आले. यावेळी युवा कार्यकर्त्यांनी एकमुखी संकल्प केला की, "भविष्यात जर कोणीही भारताची लोकशाही आणि संविधान संपवण्याचा किंवा त्याला धक्का लावण्याचा प्रयत्न केला, तर भाजपचा प्रत्येक युवा कार्यकर्ता रस्त्यावर उतरून तीव्र संघर्ष करेल आणि लोकशाहीचे रक्षण करेल." या कार्यक्रमाला संघटन सरचिटणीस व कार्यक्रम संयोजक मोरेश्वर शेडगे, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, नगरसेवक सुरेश भोईर, मंदार देशपांडे, सागर गवळी, अजय पाताडे, अजित कुलथे, दिनेश काटे पाटील, कैलास सानप, देवदत्त लांडे यांच्यासह भाजप युवा मोर्चाचे पदाधिकारी आणि विविध आघाड्यांचे प्रमुख उपस्थित होते. तसेच सम्यक साबळे, राहुल खाडे, दिनेश काटे, सुमित घाटे, राजेश डोंगरे, कृष्णा कदम, प्रशांत अलमेल, प्रदीप महाजन, यश संभेराव, ऋषिकेश भालेकर, शरद भालेकर, आदित्य कुलकर्णी, दिपराज गुप्ता, रमेश वहीले, अमित देशमुख, आशिष राऊत, गोपाल मंडल, निखिल शहाणे, अभिजीत बागुल, प्रथमेश रुपनर, जगदीश येवले, स्वप्निल गाडे, रोहित कराळे, विजय दळवी, मयूर काळभोर, विवेक बारोट, सतीश नागरगोजे, प्रदीप नाईक, अजिंक्य गोळे, संग्राम खाडे, दयानंद बंडगर, प्रतीक भालेराव यांसह पिंपरी- चिंचवडमधील अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते आणि राष्ट्रप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मेट्रो कर्मचाऱ्यांची तत्परता

■ अवघ्या काही मिनिटांत प्रवाशांचे सोन्याचे दागिने आणि पाकीट शोधून केले सुपूर्द

■ २.५ तोळे सोन्याचे दागिने असलेली बॅग अवघ्या ३० मिनिटांत परत

पिंपरी (दै. संध्या)



पुणे मेट्रोने पुन्हा एकदा प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि उत्कृष्ट सेवेसाठी असलेली आपली बांधिलकी सिद्ध केली आहे. मेट्रो कर्मचाऱ्यांची सतर्कता, अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा आणि चोख संवाद व्यवस्था यांच्या प्रभावी समन्वयामुळे दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये प्रवाशांचे हरवलेले मौल्यवान सामान अवघ्या काही मिनिटांत शोधून त्यांना सुखरूप परत करण्यात आले.

स्वारगेट मेट्रो स्थानकाचे सुरक्षा पर्यवेक्षक दीपक हजारे यांनी सुरक्षा नियंत्रण कक्षाला माहिती दिली की, प्रवासी अमृता राजेश राठोड यांची काळ्या रंगाची बॅग दुसऱ्या एका हुबेहूब दिसणाऱ्या बॅगेसोबत चुकून बदलली गेली आहे. संबंधित बॅगेमध्ये सुमारे २.५ तोळे सोन्याचे दागिने आणि इतर मौल्यवान वस्तू होत्या.

घटनेची गंभीरता लक्षात घेऊन वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक (Sr. DGM) कुलकर्णी यांनी तातडीने शोधमोहीम सुरू करण्याचे निर्देश दिले. पुणे रेल्वे स्टेशन मेट्रो स्थानकावरील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर बॅगेज स्कॅनिंगदरम्यान बॅगांची अदलाबदल झाल्याचे स्पष्ट झाले. पुढील तपासात दुसरी प्रवासी अस्मिता ही बॅग घेऊन रामवाडीच्या दिशेने गेल्याचे आणि कल्याणी नगर स्थानकावर उतरल्याचे निदर्शनास आले.

सीसीटीव्हीच्या मदतीने संबंधित प्रवासी पुन्हा पुणे रेल्वे स्टेशन येथे परतल्याचे समजताच पीआरएस पर्यवेक्षक दशरथ मुंजाल यांनी तात्काळ त्यांच्याशी संपर्क साधला. सुरक्षा व्यवस्थापक अतुल दत्ता यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या शोधमोहीमेत अवघ्या ३० मिनिटांत यश मिळाले. सायंकाळी ६.३० वाजता दोन्ही प्रवाशांना स्टेशन कंट्रोलर कार्यालयात बोलावून त्यांच्या बॅगा सुरक्षितपणे सुपूर्द करण्यात आल्या. या मोहिमेत व्यवस्थापक (सुरक्षा) अतुल दत्ता यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक विजय भोसले, हनुमान काळे आणि सीसीटीव्ही ऑपरेटर भारत भोईर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

दुसऱ्या घटनेत रामवाडी मेट्रो स्थानकावर सकाळी ६.३२ वाजता एका प्रवाशाचे पाकीट तिकीट काउंटरवर विसरले गेले होते. हे पाकीट चुकून दुसऱ्या प्रवाशाने उचलले. प्लॅटफॉर्मवर पोहोचल्यानंतर मूळ प्रवाशाला आपले पाकीट हरवल्याचे लक्षात आले आणि त्यांनी तत्काळ ग्राहक सुविधा सहाय्यकाकडे तक्रार केली. तक्रार मिळताच ग्राहक सुविधा सहाय्यकाने स्टेशन कंट्रोलर यांना माहिती दिली. स्टेशन कंट्रोलर यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने पाकीट घेतलेल्या प्रवाशाची ओळख पटवली. ट्रेन अद्याप सुटली नसल्याने स्टेशन कंट्रोलर आणि सुरक्षा रक्षक यांनी तातडीने ट्रेनमध्ये जाऊन संबंधित प्रवाशाकडून पाकीट हस्तगत केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## गोवंश बचावासाठी जुन्नरमध्ये धडक कारवाई

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर ते नारायणगाव मार्गावर अवैधरित्या गोवंश वाहतूक करणाऱ्याविरोधात जुन्नर पोलिस ठाण्याकडून कारवाई करण्यात आली. बुधवारी रात्री जुन्नर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बादशाह तलाव परिसरात रात्री साडे अकराच्या सुमारास सदरची कारवाई करण्यात आली. पिकअप गाडीमध्ये तीन गोवंश जातीची जनावरे दाटीवाटीने कोंबून कत्तलीच्या उद्देशाने घेऊन जाताना दिसल्याने, पोलीस पथकाने ती जनावरे ताब्यात घेतली.संगमनेर येथील गो शाळेत पाठवली आहे. साहिल जाकीर पठाण वय-24 वर्ष रा. बादशहा तलाव, ता. जुन्नर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलिस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांनी दिली. सदर आरोपीवर यापूर्वी सुद्धा अशाच प्रकारे 2 गुन्ह्यांची नोंद आहे. जुन्नर परिसरात यापूर्वीही गोवंश जनावरांची अवैध कत्तल व वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड, अंमलदार कैलास केंद्रे , पोलीस उपनिरीक्षक संदीप मोरे,दीपक वनवे, श्रीराम शिंदे, महेश लांडगे, ऋषिकेश तीमटे,विनोद पवार,अमोल सातपुते,विशाल चौधरी यांच्या पथकाने केली.




## पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात प्रत्येकी 3,683 रुपये जमा होणार

राजगुरुनगर (दैनिक संध्या) : राजगुरुनगर नगरपरिषदेत नोंदणीकृत दिव्यांग लाभार्थींना प्रत्येकी ३,६८३ रुपयांचे अनुदान नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ व मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांचे हस्ते नुकतेच प्राथमिक स्वरूपात वाटप करण्यात आले. यावेळी नगरपरिषदेचे नगरसेवक निलेश घुमटकर, फैज मोमीन, राजेंद्र जाधव, सागर सातकर, अमोल वाळुंज, कुमार सांडभोर, सुप्रिया पिंगळे, अश्विनी आवटे, कल्पना आढारी, राजश्री सांडभोर, सिध्दी शेळके,सुप्रिया घुमटकर,नगरपरिषदेचे विभाग प्रमुख प्राजक्ता चाकणकर,लिपिक संदेश कुंभार,लेखापरीक्षक मोहन गुरव,लेखापाल बालाजी माने आणि दिव्यांग लाभार्थी,पालक उपस्थित होते. शासनाच्या आदेशाने राज्यातील महानगरपालिका,नगरपालिका व नगरपरिषद हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना दारिद्र्य निर्मूलन योजनेअंतर्गत पाच टक्के निधी राखीव ठेवण्याचे निर्गमित केले आहे.त्या अनुषंगाने राजगुरुनगर नगरपरिषदहद्दीतील दिव्यांग बांधवाची नोंद करण्यात आलेली असून त्यामध्ये कर्णबधिर ,अस्थिव्यंग, अंध,मतिमंद इत्यादी दिव्यांग बांधवाचा समावेश आहे. राजगुरुनगर नगरपरिषद हद्दीत रहिवाशी असणारे तसेच ऑनलाईन प्रमाणपत्र असणारे एकूण १२५ लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ११५ लाभार्थी पात्र ठरले आहे. शासन आदेशानुसार राजगुरुनगर नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेल्या नगरपरिषदेच्या एकूण महसुली उत्पादनातून पाच टक्के निधी म्हणजेच एकूण ४२३५८५ इतक्या निधीपैकी पहिल्या टप्प्यात प्राप्त झालेल्या १२५ अर्जांपैकी पात्र लाभार्थींना प्रत्येकी ३६८३ इतके अनुदान बँक खात्यात जमा होणार आहे.



## प्रकाशभाऊ राजनकर यांच्याकडून विद्यार्थ्यांना मिळतेय ऊर्जा

चाकण (दैनिक संध्या) : समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून सामाजिक बांधिलकी डोळ्यासमोर ठेवून खेड तालुक्यातील रासे येथे उद्योजक प्रकाशभाऊ राजनकर यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. चाकण शिवसेना उपशहरप्रमुख प्रकाशभाऊ राजनकर यांच्या माध्यमातून रासे येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांना ऊर्जा मिळू लागली आहे. याप्रसंगी शिवसेनेचे खेड तालुका प्रमुख निलेश पवार, युवासेनेचे जिल्हाप्रमुख धनंजय पठारे, युवासेनेचे खेड तालुकाप्रमुख विशाल पोतले, चाकण शहरप्रमुख तथा नगरसेवक महेश शेवकरी, उपशहरप्रमुख प्रकाशभाऊ राजनकर, नगरसेवक अनिल लोहकरे, मंगेश कांडगे, शशिकांत जाधव, सुनिल शेवकरी, युवासेनेचे उपशहर प्रमुख मयुर भुरुक, संकेत वाघ, विभाग प्रमुख सुधीर लोणारी, रासे गावचे उपसरपंच लक्ष्मण शिंदे, शिवसेना नेते लक्ष्मण मुंगसे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मयुर मुंगसे, उपाध्यक्ष अजित शिंदे, मनोहर शेवकरी आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## एसटी स्मार्ट कार्ड वितरणात लूट

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यात एसटी स्मार्ट कार्ड वितरणासाठी नियुक्त करण्यात आलेल्या काही कंत्राटदारांकडून शासकीय शुल्कापेक्षा ₹२० ते ₹३० जास्त रक्कम आकारली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. तसेच स्मार्ट कार्ड काढण्यासाठी किमान ₹२०० पासून चे रिचार्ज करणे बंधनकारक असल्याचेही काही ठिकाणी ग्राहकांना सांगितले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे. या संदर्भात राजे ग्रुप महाराष्ट्र राज्याचे जुबेर शेख व विजय घेगडे यांनी नारायणगाव एसटी डेपोचे डेपो व्यवस्थापक श्री. पवळे यांची भेट घेऊन याबाबत चर्चा केली. यावेळी श्री. पवळे यांनी स्पष्ट केले की, एसटी स्मार्ट कार्डसाठी शासनाने निश्चित केलेले शुल्क केवळ ₹१९९ आहे. यापेक्षा एक रुपयाही जास्त शुल्क आकारू नये. कोणताही कंत्राटदार शासकीय शुल्कापेक्षा अधिक रक्कम घेत असल्याचे आढळल्यास त्याच्यावर कारवाई करून त्याचा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच, स्मार्ट कार्डसाठी रिचार्ज करणे पूर्णपणे ग्राहकाच्या इच्छेवर अवलंबून आहे. कार्ड काढताना कोणत्याही विशिष्ट रकमेचे रिचार्ज करणे बंधनकारक नाही. ग्राहकांना आवश्यकतेनुसार नंतरही एसटी बसमधील कंडक्टरकडून स्मार्ट कार्ड रिचार्ज करण्याची सुविधा शासनाने उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे, एसटी स्मार्ट कार्ड काढताना फक्त ₹१९९ इतकेच शासकीय शुल्क भरावे. यापेक्षा अधिक रक्कम किंवा सक्तीचे रिचार्ज करण्याची मागणी झाल्यास संबंधित डेपो व्यवस्थापकांकडे तात्काळ तक्रार करावी, असे आवाहन डेपो व्यवस्थापक श्री. पवळे यांनी केले आहे. आणि ज्या ग्राहकांकडून जास्तीचे पैसे घेण्यात आलेत त्यांना कार्ड तयार झाल्यावर कार्ड देताना वरचे पैसे पुन्हा परत केले जातील अशी माहिती पवळे साहेबांनी दिली.

## प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या उमेदवारीसाठी मा. ना. हर्षवर्धन पाटील यांची सदिच्छा भेट

इंदापूर (दै. संध्या)




पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवार तथा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य श्री. नंदकुमार सागर आणि पुणे जिल्हा माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष श्री. प्रसाद गायकवाड यांनी महाराष्ट्र राज्याचे माजी संसदीय कामकाज मंत्री, माजी सहकार मंत्री तथा इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आदरणीय मा.ना. श्री. हर्षवर्धन पाटील साहेब यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसंदर्भात चर्चा करण्यात आली. शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी सक्षम नेतृत्वाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या उमेदवारीसाठी मार्गदर्शन, सहकार्य आणि पाठिंबा देण्याची विनंती मा.ना.हर्षवर्धन पाटील साहेब यांच्याकडे करण्यात आली.

याप्रसंगी मा.ना.हर्षवर्धन पाटील यांनी शिक्षण क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक भूमिका घेण्याची ग्वाही देत उपस्थितांशी मनमोकळा संवाद साधला. या भेटीमुळे पुणे विभागातील शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आगामी निवडणुकीच्या दृष्टीने या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## आदिवासी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

■ ६ जुलैला पहिली गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणार

■ वसतिगृहपाल प्रतिभा रावळ, निलेश शिंदे

राजगुरुनगर (दै. संध्या)

आदिवासी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून ६ जुलैला पहिली गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणार असल्याची माहिती वसतिगृहपाल प्रतिभा रावळ, निलेश शिंदे यांनी दिली. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाचा श्रीगणेशा झाला असून, शाळा, विद्यालये व महाविद्यालये सुरु झाले आहेत. त्यापार्श्वभूमीवर आदिवासी विकास विभागाने राज्यातील शासकीय वसतिगृह प्रवेश आणि पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेच्या प्रवेश प्रक्रियेचे अधिकृत वेळापत्रक जाहीर केले आहे. या वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्याचे आदेश आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड यांनी सर्व अपर आयुक्त, प्रकल्प अधिकारी आणि गृहपाल यांना दिले आहेत. विविध अभ्यासक्रमांच्या स्त्रांनुसार अर्ज करण्याची व गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्याची तारीख निश्चित करण्यात आली आहे. प्री-मॅट्रिक विद्यार्थ्यांसाठी नवीन प्रवेश अर्ज १६ जून २०२६ पासून सुरू झाले असून, त्यांची गुणवत्ता यादी ६ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध होईल. याव्यतिरिक्त, ज्युनिअर कॉलेज, डिप्लोमा, पदवी, पदव्युत्तर आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेश अर्ज १ जुलै २०२६ पासून सुरू होणार आहेत. या सर्व अभ्यासक्रमांची गुणवत्ता यादी २२ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाईल. तर १ जुलैपासून स्वयंम योजनेच्या अर्जाचे नूतनीकरण करता येणार आहे.



## लग्नाचे आमिष दाखवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक अमोल पन्हाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, संबंधित टोळीने यापूर्वीही अशाच प्रकारे इतरांची फसवणूक केली आहे का, याचा शोध घेतला जात आहे. लग्नाच्या नावाखाली होणाऱ्या अशा फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

नारायणगाव (दै. संध्या)

लग्नाचे आमिष दाखवून तरुणांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा आळेफाटा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. लग्नानंतर अवघ्या २४ तासांत नवरी पळून जाण्याच्या तयारीत असताना हा प्रकार उघडकीस आला.

या प्रकरणी नवरीसह चौघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.अजय भीमराज रोहोम रा. एकरुखे, ता. राहाता, जि. अहिल्यानगर यांनी आळेफाटा पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार अमोल पिंजारी रा. श्रीरामपूर ,संगीता शिंदे रा. आळे, ता. जुन्नर, राधा रमेश काळे रा. जालना आणि सोनाली भोसले रा. परतूर, जि. जालना यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, अजय रोहोम यांच्या विवाहासाठी मध्यस्थांमार्फत आळे येथील एजंट संगीता शिंदे हिच्याशी संपर्क साधण्यात आला होता. तिने राधा रमेश काळे हिला वधू म्हणून दाखवत विवाह जुळवून आणला. २० जून रोजी आळे येथे दोघांचा विवाह पार पडला.

या विवाहासाठी संबंधित एजंटला तब्बल एक लाख साठ हजार रुपये देण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी २१ जून रोजी कोपरगाव येथे पारंपरिक पद्धतीने पुन्हा विवाहसोहळा पार पडला. त्यानंतर अजय रोहोम नववधूला घेऊन आपल्या गावी परतले. मात्र त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या घराबाहेर काळ्या काचा असलेली पांढऱ्या रंगाची व्हर्ना कार येऊन थांबली. ही कार पाहताच नवरी राधा घराबाहेर धावत गाडीकडे जाऊ लागली. घरच्यांना संशय आल्याने त्यांनी तिला अडवले. त्यामुळे संबंधित वाहन तेथून भरधाव वेगाने निघून गेले.


या घटनेनंतर कुटुंबीयांनी राधाकडे चौकशी केली असता तिने धक्कादायक माहिती दिली. संबंधित कार तिला घेऊन जाण्यासाठीच आली होती. आळेफाटा येथे जाऊन एजंटकडून पैशांमधील स्वतःचा हिस्सा घेऊन जालना येथे परत जाण्याचा तिचा बेत असल्याचे तिने कबूल केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.आपली नियोजनबद्ध फसवणूक झाल्याचे लक्षात येताच अजय रोहोम यांनी आळेफाटा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवत तपास सुरू केला आहे.

## जेजुरीत सीएनजी पंप नसल्याने ग्राहकांची वनवन

जेजुरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत सी एन जी पंप नसल्याने जेजुरी व परिसरातील वाहन धारक व भाविकांना सी एन जी साठी वनवन करावी लागत आहे. जेजुरी हे तीर्थक्षेत्र असल्याने खंडोबा देवाच्या दर्शनासाठी येथे लाखो भाविक विविध वाहनांनी येथे येत असतात. जेजुरी व परिसरात शेकडो चारचाकी वाहने आहेत.तसेच जेजुरी हे औद्योगिक क्षेत्र असल्याने उद्योजक कामगार यांची वाहने या जा करीत असतात. यातील मोठ्या प्रमाणात वाहनात सी एन जी चा वापर केला जातो. जेजुरीत यापूर्वी एका पेट्रोल पंपावर सी एन जी ची विक्री होत होती. गेली आठ ते दहा महिने हा पंप बंद झाल्याने नागरिकांची मोठी कुचंबणा झाली आहे. जेजुरी व परिसरातील नागरिकांना सासवड, मोरगाव, तसेच सोमेश्वर आणि लोणंद येथे सी एन जी भरण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. सुमारे 20 ते 30 किलोमीटर अंतरावर जाऊन सी एन जी भरावा लागत आहे. त्यातच सासवड अगर मोरगाव येथे जाऊन तेथील पंपावर सी एन जी उपलब्ध न झाल्यास नागरिकांची मोठी गैरसोय होऊन आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. जेजुरी येथे सी एन जी पंप सुरू झाल्यास हजारो भाविक, तसेच जेजुरी व परिसरातील नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे. लवकर जेजुरीत सी एन जी पंप सुरू करावा अशी येथील नागरिक व भाविकांची मागणी आहे.

## शनिवारी मोफत नेत्रतपासणी शिबिर



जेजुरी (दै. संध्या)

रोटरी क्लब ऑफ पुणे मिड टाऊन, रोटरी क्लब सासवड, विश्व निरंजन नेत्र हॉस्पिटल सासवड, ट्रिनिटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे , के जे एज्युकेशनल इन्स्टिट्यूट पुणे यांच्या वतीने शनिवार दिनांक 27 रोजी सासवड येथील दादा जाधवराव सांस्कृतिक भवन येथे मोफत नेत्र तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे नेत्रतज्ञ डॉ. प्रवीण जगताप यांनी सांगितले. या शिबिरात मोफत नेत्र तपासणी, मोफत चष्मे व औषधे वाटप करण्यात येणार आहे. नेत्र तज्ञ डॉ. चंद्रशेखर, डॉ. प्रवीण जगताप, डॉ. तेजस्विनी तोडकर, डॉ. अश्विनी जगताप रुग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत.

## व्यायामाशिवाय हृदयाचे आरोग्य अशक्य : डॉ. राऊत

नारायणगाव (दै. संध्या)

कोणतीही पूर्वलक्षणे न दिसता अचानक हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू होण्याच्या घटनांमध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे.

ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक असून, नागरिकांनी आपल्या आरोग्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नये. हृदयविकाराचा धोका टाळण्यासाठी प्रत्येकाने दैनंदिन जीवनात नियमित व्यायाम करणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रख्यात हृदयविकार व सर्पदंश तज्ज्ञ डॉ. सदानंद राऊत यांनी केले.



जुन्नर तालुका पर्यटन विकास संस्थेचे अध्यक्ष व निसर्ग अभ्यासक यश मस्करे यांचे वडील कै. तुकाराम पांडुरंग मस्करे यांच्या दशक्रिया विधीच्या निमित्ताने आयोजित आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रमात डॉ. राऊत बोलत होते.यावेळी बोलताना डॉ. राऊत म्हणाले की, आजच्या धावपळीच्या युगात केवळ ज्येष्ठ नागरिकच नव्हे, तर तरुणांमध्येही हृदयविकाराचे प्रमाण वेगाने वाढत आहे.

अनेकदा किरकोळ वाटणाऱ्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यामुळे गंभीर परिणाम भोगावे लागतात. त्यामुळे छातीत दुखणे, अस्वस्थ वाटणे किंवा श्वास घेण्यास त्रास झाल्यास त्वरित जवळच्या डॉक्टरांशी संपर्क साधून उपचार घेणे गरजेचे आहे.

डॉ. राऊत यांनी पुढे स्पष्ट केले की, हृदयविकार किंवा सर्पदंश झालेल्या रुग्णाला रुग्णालयात नेताना विशेष काळजी घेणे आवश्यक असते.

योग्य वेळेत योग्य उपचार न मिळाल्यास रुग्णाचा जीव जाऊ शकतो. सर्पदंशाच्या बाबतीतही वेळेवर प्रथमोपचार आणि वैद्यकीय मदत मिळाल्यास मृत्यू टाळणे सहज शक्य आहे. त्यामुळे कोणत्याही आजाराला किरकोळ समजण्याची चूक करू नका, असे आवाहन त्यांनी उपस्थित ग्रामस्थांना केले.

या दशक्रिया विधीच्या कार्यक्रमात कोणतेही राजकीय किंवा इतर भाषण न करता केवळ आरोग्यविषयक जनजागृतीचा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. मस्करे परिवाराने समाजासमोर ठेवलेल्या या आदर्शाचे डॉ. राऊत आणि उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

# पळस्पे–कोन उड्डाणपूल व रस्ते प्रकल्पातील अडचणींवर आक्रमक भूमिका

### “शून्य अपघात” अभियानासह प्रकल्पग्रस्तांना न्याय व सुरक्षित वाहतुकीवर भर

उरण (दै. संध्या)

उरण विधानसभा मतदारसंघातील पनवेल तालुक्यात सुरू असलेल्या पळस्पे–कोन उड्डाणपूल व रस्ते प्रकल्पाच्या कामामध्ये प्रकल्पग्रस्तांना मोबदला, वाहतूक नियोजन, सुरक्षा उपाययोजना आणि कामातील विलंब यांसारख्या गंभीर प्रश्नांमुळे अडथळे निर्माण होत असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर भाजप युवा नेते अतुल घरत यांनी आक्रमक भूमिका घेत संबंधित प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

प्रकल्पाच्या (पळस्पे )0 ते 1700(कोन) रोड मार्क या टप्प्यात अनेक ठिकाणी प्रकल्पग्रस्तांच्या जमिनींचा मोबदला प्रलंबित असल्याने विकासकामांचा वेग मंदावला आहे. महसूल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) आणि MMRDA यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे नियोजनात त्रुटी असल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सुरू असल्याचे समजताच अतुल घरत यांनी संबंधित माहिती आमदार महेश बालदी यांना देत त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष बैठक घेणार असल्याचे सांगितले.

दरम्यान, फेब्रुवारी ते जून २०२६ या कालावधीत या मार्गावर झालेल्या अपघातांमध्ये दोन निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याने परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्ते सुरक्षेतेच्या दृष्टिकोनातून तसेच दुर्घटनांबाबत स्थानिक नागरिकांनी रायगड जिल्हा परिषद सदस्या हर्षदा अतुल घरत यांच्या कार्यालयात तक्रारी दाखल करीत पावसाळ्यातील सांडपाणी व वाहतूक कोंडी बाबतीत माहिती दिली.

या तक्रारींची दखल घेत २६ जून रोजी भाजप युवा नेते अतुल घरत ,गोरखनाथ धुमाळ,रवी शेळके,हरीश घरत,पत्रकार साबीर शेख, स्थानिक ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि शिष्टमंडळासह वाहतूक नियंत्रण विभागाचे वरिष्ठ पोलीस अधिकारी सकपाळ तसेच गोवर कन्स्ट्रक्शनच्या प्रतिनिधींसोबत पळस्पे ते कोन मार्गाची प्रत्यक्ष पाहणी केली.

पाहणीदरम्यान अपघातप्रवण ठिकाणे, धोकादायक वळणे, क्रॉसिंग, वाहतूक नियंत्रण, पावसाच्या पाण्याचा निचरा, सूचना फलक, गटारे, यू-टर्न आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात आल्या. तसेच प्रकल्पग्रस्त आणि विकासकामांमधील प्रलंबित प्रश्नांवरही चर्चा करण्यात आली.

डी-मार्ट परिसर हा प्रकल्पाचा 'झिरो पॉइंट' मानण्यात आला असून तेथून कोन चौकीपर्यंत १७०० रोड मार्क निश्चित करण्यात आले आहेत. या दरम्यान भारत पेट्रोलियमलगतचा वैभव पेट्रोल पंप, ट्रेलरची वर्दळ, झाडे, शेतकऱ्यांचा मोबदला, कार शोरूम, यू-टर्न, गटारे आणि विविध क्रॉसिंग ही वाहतुकीसाठी अडचणीची ठिकाणे असल्याचे निदर्शनास आले असता सर्व संबंधितांना अतुल म्हात्रे यांनी संपर्क करीत सकारात्मक मार्ग काढण्याचे यशस्वी प्रयास केल्याने भविष्यात कामाला गती वाढेल अशी अपेक्षा दिसली.

सर्वसामान्य जनतेला वेटीस धरू नये, रस्ते सुरक्षा नियम पाळावे, मोबदला द्यावा अश्या या सर्व गंभीर मुद्द्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ, प्रकल्पग्रस्त, संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांची संयुक्त बैठक घेण्यात येणार आमच्या साठी "विकास महत्त्वाचा आहे; मात्र तो जीवाशी खेळून होऊ नये. प्रकल्पग्रस्तांना न्याय, सुरक्षित रस्ते आणि शून्य अपघात हेच आमचे ध्येय आहे,रस्ते विकासाला महत्वाचे त्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे " अशी भूमिका अतुल घरत यांनी यावेळी मांडली.




पळस्पे - कोन ट्राफिक कमी करण्यासाठी एक्सप्रेस उड्डाणपूला हा पूल जोडणे महत्वाचे होते .कोन वाहतूक पोलीस चौकी ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे . पळस्पे उड्डाणपूल थेट द्रुतगती महामार्गाशी जोडला जात नसून तो जुन्या मुंबई–पुणे महामार्गाला रसायनी सावळा मार्गाला जोडला जात आहे ज्याने भविष्यातील वाहतूक नियोजनाबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे.


**- महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ (पत्रकार साबीर शेख)**

शनिवार, दि. २७ जून २०२६ www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews






दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# कोळंबी पालन व्यवसायाला चालना देणार : राणे

■ मुंबई (दै. संध्या)

चंद्रपूर जिल्ह्यातील मत्स्यव्यवसायाला नवी दिशा देण्यासाठी आणि ग्रामीण भागातील मत्स्य शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी कोळंबी पालन व्यवसायाच्या विस्ताराला राज्य शासन प्राधान्य देत आहे. बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील तलावांमध्ये जम्बो प्रॉन्स जातीच्या कोळंबी बीजांचे संचयन करून झिंगे उत्पादन वाढविण्याच्या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करण्यात येणार असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिली.



चंद्रपूर जिल्ह्यातील कोळंबी पालन व्यवसायाला चालना देण्यासाठी टायगर प्रॉन्स जातीचे सुमारे तीन कोटी कोळंबी बीज विशेष बाब म्हणून शासनामार्फत उपलब्ध करुन देण्याबाबत आढावा बैठक मंत्रालयात झाली त्यावेळी मंत्री राणे बोलत होते. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार, मत्स्यव्यवसाय आयुक्त तथा महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.प्रदीप, महाराष्ट्र मत्स्योद्योग महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री राणे म्हणाले, चंद्रपूर जिल्ह्यातील कोळंबी पालन व्यवसायाला चालना देण्यासाठी सुमारे ३ कोटी कोळंबी बीज उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांनी शासनाकडे निवेदन सादर केले आहे. या प्रस्तावाच्या माध्यमातून जिल्ह्यातील उपलब्ध जलसंपत्तीचा अधिक परिणामकारक वापर करून मत्स्य उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. मंत्री नितेश राणे म्हणाले की, राज्यातील मत्स्य शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, ग्रामीण रोजगारनिर्मितीला चालना देणे आणि अंतर्गत जलाशयांमधील मत्स्य उत्पादन क्षमता वाढविणे हे विभागाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. चंद्रपूरसारख्या जिल्ह्यांमध्ये उपलब्ध तलावांचा प्रभावी वापर करून कोळंबी पालनाला प्रोत्साहन दिल्यास स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील तसेच मत्स्यव्यवसाय क्षेत्राला आर्थिक बळकटी मिळेल.

सध्या विभागाकडे गोड्या पाण्यातील कोळंबी बीज पुरवठ्यासाठी स्वतंत्र योजना नसली तरी नाविन्यपूर्ण योजनांतर्गत जिल्हा नियोजन समिती अथवा जिल्हा खनिकर्म प्रतिष्ठान योजनांमधून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या पर्यायांचा विचार करता येऊ शकतो. राज्य शासन मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून मत्स्य उत्पादन वाढ, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठ उपलब्धता यांसोबतच कोळंबी पालनासारख्या उच्च मूल्याच्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील हा उपक्रम यशस्वी झाल्यास विदर्भातील इतर जिल्ह्यांसाठीही तो आदर्श मॉडेल ठरू शकतो, असा विश्वास मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला.




## मच्छिमारांच्या सुविधांसाठी दिघी जेट्टी प्रकल्प पावसाळा संपल्यानंतर तातडीने मार्गी लावा

■ बंदरे मंत्री नितेश राणे

■ मुंबई (दै. संध्या)

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील मौजे दिघी येथील मच्छिमारांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेला जेट्टी प्रकल्प पावसाळा संपल्यानंतर तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री नितेश राणे यांनी दिले. मच्छिमार जेट्टी प्रकल्प तसेच परिसरातील गाळ काढण्याच्या कामांचा आढावा मंत्रालयातील दालनात मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. बैठकीत महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिघी मच्छिमार जेट्टी प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली असून निविदा प्रक्रियेस विलंब होत असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. तसेच जेट्टी परिसरातील गाळ काढण्याच्या कामाबाबतही यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी जेट्टीच्या दुरुस्तीची तसेच गाळ काढण्याची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील, असे सांगितले. मच्छिमारांना सुरक्षित व सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सर्व प्रशासकीय प्रक्रिया गतीमान करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. बैठकीस महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, मत्स्यव्यवसाय आयुक्त तथा महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप, महाराष्ट्र मत्स्योद्योग महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## आशा स्वयंसेविका व कंत्राटी कर्मचाऱ्यांना राज्य विमा (ESIS) योजना लागू करण्याचा प्रस्ताव तातडीने सादर करा

### सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील आशा स्वयंसेविका तसेच 21 हजार रुपयांपेक्षा कमी पगार असलेल्या कंत्राटी (एनएचएम) कर्मचाऱ्यांना राज्य कामगार विमा योजना (ESIS) लागू करण्याबाबतचा प्रस्ताव तत्काळ सादर करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. या प्रस्तावामुळे राज्यातील हजारो कर्मचारी व कुटुंबियांना आरोग्य सुरक्षिततेचा लाभ होईल.

मंत्रालयातील आरोग्यमंत्र्यांच्या समिती कक्षात आयोजित बैठकीत आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तक, आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचारी तसेच पतसंस्था कर्मचारी, रेशन दुकानातील कामगार, खाजगी शाळांचे कर्मचारी, स्वयंरोजगार संस्था तसेच वाचनालयातील कर्मचारी अशा 21 हजार रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या घटकाना राज्य कामगार विमा योजनेचा लाभ देण्याच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण चर्चा झाली. या बैठकीला आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन, राज्य कामगार विमा योजनेचे आयुक्त रमेश चव्हाण, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक व आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर अतिरिक्त आयुक्त डॉ. सुनील



भोकरे, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, राज्य कामगार विमा योजनेचे संचालक सोहम वायाळ उपस्थित होते. राज्यात सुमारे 84,000 आशा सेविका कार्यरत असून, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध योजना व उपक्रम सर्वसामान्य माणसांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात आशा सेविकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान, व आपत्कालीन वैद्यकीय सेवा (108/102) अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे देखील आरोग्य योजना प्रभावीपणे राबविण्यात योगदान असते. या कर्मचाऱ्यांना कंत्राटी स्वरूपातील नियुक्तीमुळे नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे सामाजिक सुरक्षा लाभ मिळत नाहीत. अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या व त्यांचा कुटुंबियाना आरोग्य सुरक्षितता देण्यासाठी राज्य कामगार विमा योजनेच्या कक्षेत आणण्याबाबतचा सकारात्मक प्रस्ताव सादर करावा असे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी दिले.

राज्यातील नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन, स्वयंरोजगार संस्था, रेशन दुकान कर्मचारी संघटना, सार्वजनिक वाचनालयातील कर्मचारी तसेच खासगी शैक्षणिक संस्थेत कार्यरत कर्मचाऱ्यांची अनेक दिवसापासून राज्य कामगार विमा योजनेत सहभागी करून घेण्याची मागणी आहे. अशा प्रकारचे काम करणाऱ्या व अल्पउत्पन्न असलेल्या कर्मचाऱ्यांवरील वैद्यकीय खर्चाचा भार कमी करण्यासाठी तसेच अपघात, गंभीर आजार आणि मातृत्वाच्या काळात आर्थिक सुरक्षितता प्रदान करण्यासाठी ईएसआयएस योजनेच्या माध्यमातून लाभ देण्याबाबत आरोग्य विभाग सकारात्मक असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील हजारो आशा स्वयंसेविका, गटप्रवर्तक आणि कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकटी मिळेल.

## पॉश कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी होणार

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील शासकीय तसेच खासगी आस्थापनांमध्ये महिलांना सुरक्षित, सन्मानजनक आणि लैंगिक छळमुक्त कार्यस्थळ उपलब्ध करून देण्यासाठी 'पॉश' (POSH) कायद्याच्या अंमलबजावणीला अधिक बळकटी देण्यात येणार असून, यासाठी महिला व बालविकास विभाग आणि कामगार विभागाने समन्वयाने काम करावे, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. मंत्रालयात आयोजित महिला व बालविकास व कामगार विभागाच्या संयुक्त आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस दोन्ही विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री तटकरे यांनी सांगितले की, कार्यस्थळी महिलांवरील लैंगिक छळ रोखण्यासाठी पॉश कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. काही खासगी आस्थापनांमध्ये या कायद्याची अपेक्षित अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले



असून, त्यासाठी अधिक सक्षम उपाययोजना करण्यात येणार आहेत. कामगार, उच्च व तंत्र शिक्षण, शालेय शिक्षण, उद्योग तसेच संबंधित विभागांच्या सहभागातून पॉश कायद्याच्या अधिक प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक उपाययोजनांचा सविस्तर अहवाल तयार करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. बैठकीत अंतर्गत तक्रार समित्यांचे गठन व पुनर्गठन, ऑडिट प्रक्रियेत पॉश कायद्याच्या अंमलबजावणीचा समावेश, तसेच खासगी संस्थांच्या नोंदणी व नूतनीकरण प्रक्रियेत पॉश कायद्याअंतर्गत आवश्यक तरतुदींचा समावेश करण्याबाबत सुरू असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. याशिवाय, शासनाने प्राधिकृत केलेल्या तपासणी अधिकाऱ्यांमार्फत जिल्हानिहाय तपासण्या अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असून, सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यस्थळ सुनिश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बैठकीत कामगार विभागाने माहिती दिली की, अंतर्गत तक्रार समित्या स्थापन करणे आणि आवश्यकतेनुसार त्यांचे पुनर्गठन करणे, ऑडिट प्रक्रियेत पॉश कायद्याच्या पालनाचा समावेश करणे तसेच खासगी संस्थांच्या नोंदणी व नूतनीकरण प्रक्रियेत अंतर्गत तक्रार समिती स्थापनेची अट समाविष्ट करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच, ज्या आस्थापनांमध्ये दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, तेथे अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक असून, या तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी संबंधित अधिकारी प्रत्यक्ष भेटी देऊन तपासणी करणार असल्याचेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

## महाड मच्छी मार्केट इमारतीसाठी १५ दिवसांत प्रस्ताव सादर करा

■ मुंबई (दै. संध्या)

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यातील महाड शहरात मच्छी मार्केट इमारत प्रकल्पाचा परिपूर्ण व सर्वसमावेशक प्रस्ताव तयार करून तो १५ दिवसांच्या आत शासनाकडे सादर करावा, असे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले. प्रस्ताव सादर झाल्यानंतर आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तत्काळ करण्यात येईल, असेही मंत्री नितेश राणे यांनी स्पष्ट केले. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यातील महाड शहरात मच्छिमार्केट उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत मंत्रालयातील दालनात मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत महाड नगरपरिषदेकडून मच्छी मार्केट उभारणीसंदर्भात आतापर्यंत करण्यात आलेल्या कामांचा सविस्तर




आढावा मंत्री राणे यांनी घेतला. या प्रकल्पामुळे मत्स्यव्यवसायाशी संबंधित विक्रेते, मच्छी व्यावसायिक तसेच ग्राहकांना आधुनिक आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. बैठकीस आमदार प्रवीण दरेकर, मत्स्यव्यवसाय आयुक्त पी. प्रदीप, महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले तसेच महाड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

## वसंतराव नाईक कृषी पुरस्कार २०२६ जाहीर

■ १८ शेतकरी व संस्थांचा होणार गौरव

■ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात १ जुलै रोजी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन

■ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार

■ मुंबई (दै. संध्या)

वसंतराव नाईक कृषी संशोधन आणि ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या वतीने दिले जाणारे वसंतराव नाईक कृषी पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आले आहेत. यावर्षी राज्यातील विविध भागांतील १८ विजेत्यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात येणार असल्याची माहिती राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली. विधान भवन येथील मंत्रालय विधिमंडळ पत्रकार संघ येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सांगितले की, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी हा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित केला जातो. यंदाचा कार्यक्रम १ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात होणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.




प्रतिष्ठानच्या वतीने कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, संशोधक आणि संस्थांचा गौरव करण्याची परंपरा सुरू आहे. आतापर्यंत ३०४ शेतकरी आणि ८५ संस्थांना पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. तसेच राज्यभरात कृषीविषयक चर्चासत्रे, प्रशिक्षण शिबिरे आणि विविध जनजागृती उपक्रमही प्रतिष्ठानमार्फत राबविण्यात आले आहेत. यावर्षी राज्यातील विविध भागांतील १८ विजेत्यांचा पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. गडचिरोली, रत्नागिरी, धुळे, जळगाव यांसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील शेतकरी आणि संस्थांना या पुरस्कारांसाठी निवडण्यात आले आहे.

पुरस्कार विजेत्यांची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे – सामाईक पुरस्कार – किसान मार्केट यार्ड- अध्यक्ष गिरीश अग्रवाल, शेलू ( बु), नांदेडरोड, जि. यवतमाळ., कृषी उल्लेखनीय योगदान पुरस्कार – डॉ. आदिनाथ चव्हाण, पुणे, कृषी साहित्य पुरस्कार – सतीश खाडे, पुणे., कृषी पत्रकारिता पुरस्कार- भिलाजी दिगंबर जिरे, मु. पो- कुडाशी, जि- धुळे., कृषी निर्यात पुरस्कार- राजे रावरंभा शेतकरी उत्पादक कंपनी, अध्यक्ष – विकास वीर, करमाळा कुर्डूवाडी रोड, जि- सोलापूर., फलोत्पादन पुरस्कार – राजेश श्रीविलास पटवर्धन, रत्नागिरी., भाजीपाला व रोपवाटिका संवर्धन पुरस्कार – वैभव उघडे, वर्धा., दुग्ध व्यवसाय व पशुसंवर्धन पुरस्कार – गौ ॲग्रोटेक कोल्हापूर ऑर्डर फार्मर प्रोड्युसर कंपनी, अध्यक्ष – योगेश खराडे, शिंदेवाडी, जि- कोल्हापूर, जलसंधारण पुरस्कार – डॉ. सुमंत पांडे, बाणेर, पुणे., आधुनिक फुलशेती पुरस्कार – दादासाहेब दौलतराव शिंदे, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर, सामाजिक वनीकरण पुरस्कार – विशाल वसंतराव पाटील, सोयगाव, मालेगाव आणि संदीप मधुकर लोहारकर, संगमेश्वर, मालेगाव., महिला केंद्रित ग्रामविकास पुरस्कार – योगेश्वरी चौधरी, दाव्वा, जि- गोंदिया., पुनर्जीवित शेती पुरस्कार –सदाशिव वामनराव अडकिने, इंजनगाव पश्चिम, जि- हिंगोली., नाविन्यपूर्ण शेतकरी पुरस्कार- अमित बाजीराव पाटील, कोल्हापूर., कृषी प्रक्रिया पुरस्कार – सुश्रुत पाटील, मु. पो- वाणगाव, जि- पालघर, रेशीम उद्योग पुरस्कार – जीवन अशोक चिप्रीकर आणि अश्विनी चिप्रीकर, कवठेएकंद, जि- सांगली., जैवविविधता पुरस्कार – शंकर बाबा शिंदे (गिधाडबाबा) मु. पो – चिंचवडचा खोरीपाडा, जि- नाशिक., आधुनिक स्टार्टअप पुरस्कार – प्रवीण मोगल आणि सचिन मोगल, निफाड, जि- नाशिक.



## प्रभावी अंमलबजावणी करा

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील आदिवासी महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण करण्यासाठी 'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण' योजनेची अंमलबजावणी अत्यंत प्रभावीपणे करून आदिवासी भागात महिला बचत गटांचे जाळे निर्माण करावे, असे निर्देश आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक वुईके यांनी दिले. मंत्रालयात आयोजित आदिवासी विकास विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, सहसचिव मच्छिंद्रनाथ शेळके उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### मुख्यमंत्री यांची 'सारथी' कार्यालयास भेट

पुणे (दैनिक संध्या) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) मुख्यालयास भेट देऊन तेथील उपक्रमांची माहिती घेतली. शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, मनपा आयुक्त नवलकिशोर राम, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सचिव शैला ए., विभागीय आयुक्त शीतल तेली उगले, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सारथीचे अध्यक्ष अजित निंबाळकर, व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. महेश पाटील यांनी सारथीच्या विविध उपक्रमांची सादरीकरणाद्वारे त्यांना माहिती दिली.



### शाहू महाराज यांना विधानभवनात अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस विधानभवन येथे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (१) जितेंद्र भोळे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे उपसचिव विजय कोमटवार, संचालक, वि.स.पागे, संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

### छत्रपती शाहू महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे कक्ष अधिकारी निलेश हरड, सहायक कक्ष अधिकारी अमोल चव्हाण, विजय शिंदे व अन्य कर्मचारी उपस्थित होते.

### शिवराज्याभिषेक दिनानिमित्त गीताचे लोकार्पण

मुंबई (दैनिक संध्या) : सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, २७ जून रोजी सकाळी ११ वाजता रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे विशेष 'शिवराज्याभिषेक गीता' चे लोकार्पण होणार आहे. तसेच, शिवस्वराज्यगाथा या प्रेरक गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या प्रेरणेने विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेले प्रेरक शिवराज्याभिषेक गीत ॲड. मृणाल भिडे यांनी रचले आहे. अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर यांची संकल्पना आणि संयोजन असलेल्या या गीताच्या निर्मितीसाठी विभागाच्या उपसचिव नंदा राऊत, महेश वाव्हळ, सांस्कृतिक कार्य संचालक श्रीराम पांडे यांचे विशेष सहाय्य लाभले आहे. यावेळी सईशा प्रॉडक्शन्स, मुंबई निर्मित व प्रस्तुत 'संगीत शिवस्वराज्यगाथा' हा नवगीतांचा प्रेरणादायी सांगीतिक कार्यक्रम होणार आहे. यासाठी प्रवेश विनामूल्य असून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश असेल. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.




# जेजुरीत जागा वाचविण्यासाठी लोणारी समाजाचा मोर्चा

जेजुरी (दै. संध्या)

■ चुकीचे काम करणाऱ्यांना समाज जागा दाखवील. जेजुरीत लोणारी समाजाची धर्मशाळा उभारणार : माजी आमदार रवींद्र धंगेकर

मागील पिढी दानशूर होती, राज्याच्या विविध भागात या दानशूर व्यक्तींनी जागा दान केल्या मुळे लोणारी समाजाची मालमत्ता निर्माण झाली आहे. जेजुरीतील 23 एकर जागा व धर्मशाळेची जागा ही लोणारी समाजाची मालमत्ता आहे. विश्वस्तांनी मनमानी कारभार केला आहे, समाज त्यांच्या चुकीला माफ करणार नाही. या जागेत राज्याच्या लोणारी भाविकांसाठी येत्या दोन वर्षात धर्मशाळा उभी राहील असे प्रतिपादन माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी केले.

तिर्थक्षेत्र जेजुरी नगरीत राधाबाई बाबाजी नरळे लोणारी ट्रस्टची 23 एकर जागा असून ही जागा विकण्याच्या घाट ट्रस्टच्या विश्वस्तांनी सुरू केला आहे. तसेच जेजुरी शहरातील अखिल भारतीय लोणारी धर्मशाळा असून या ट्रस्टच्या विश्वस्तांनी मनमानी करून गैर व्यवहार केले आहेत याच्या विरोधात माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्या नेतृत्वाखाली जेजुरीत लोणारी समाज बांधवांचा मोर्चा काढून सभेचे आयोजन करण्यात आले होते.

राधाबाई नरळे लोणारी ट्रस्टच्या जागे पासून ते जेजुरी शहरातील लोणारी धर्मशाळे पर्यंत माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला. यावेळी राज्याच्या विविध भागातून मोठ्या संख्येने लोणारी समाज उपस्थित होता.

यावेळी बोलताना माजी आमदार रवींद्र धंगेकर पुढे म्हणाले की जेजुरीतील दोन्ही जागा या समाजाच्या मालकीच्या आहेत, मनमानी करणाऱ्या जुन्या विश्वस्तांनी खोटी प्रतिष्ठा जास्त दिवस टिकू शकणार नाही, जेव्हा समाज रस्त्यावर येतो तेव्हा चुकीचे वागणाऱ्यानां जागा दाखवतो. गैर व्यवहार करणाऱ्यांना समाज बेड्या ठोकतील. ट्रस्टची 23 एकर जागा विकण्याच्या प्रयत्न करणाऱ्या विश्वस्ताना समाज जाब विचारत असून त्यांच्या विरोधात हा लढा सुरू राहील. असे सांगून जेजुरीतील धर्मशाळा उभारण्यासाठी त्याची 21 लाख रुपये देण्याची घोषणा केली.

यावेळी समस्त लोणारी समाजाच्या वतीने या दोन्ही ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाला तात्काळ बरखास्त करण्याचा ठराव एकमताने मंजुर करण्यात आला .

यावेळी सामाजिक कार्यकर्ते व जेजुरी उद्योजक संघाचे अध्यक्ष डॉ रामदास कुटे यांनी जेजुरीत लोणारी समाजाच्या वतीने आयोजित मोर्चा हा व्यक्तींच्या विरोधात नसून चुकीचे काम करणाऱ्या प्रवृत्तीच्या विरोधात आहे. ट्रस्टची सुमारे 100 कोटींची 23 एकर जागा 9 कोटी रुपयांत विकण्याचा घाट घालून मलिदा खाण्याचा प्रकार सुरू असून ही समाजाची जागा विकता येणार नाही, विश्वस्तांच्या नाकर्तेपणामुळे धर्मशाळेचे मातेरे झाले आहे. दोन्ही ट्रस्ट बरखास्त करून राज्यातील लोणारी समाजाच्या भाविकांसाठी, समाजाच्या विकासाठी या जागेचा वापर केला जाईल.

यावेळी सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुभाष नरळे, नगरसेवक नवनाथ रानगट, गोरख शिंदे, तानाजी करचे , सातारा जिल्हा परीषदेचे माजी सभापती शिवाजीराव शिंदे, डॉ.सुदर्शन घेडगे, नर्मदाताई खाडे आदीची भाषणे झाली.

कार्यक्रमाचे नियोजन डॉ रामदास कुटे, उमाजी नाना ढेंबरे , संदीप होळकर , माजी सरपंच सोमनाथ कणसे, सुजित राणे आदींनी केले.

श्रीकांत राणे यांनी सुत्रसंचालन केले तर अप्पासाहेब करचे यांनी आभार मानले .

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीस ठोठावली शिक्षा

## अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायालय जुन्नर यांचा निर्णय, ३ वर्ष कारावास व १ हजार दंडाची शिक्षा

नारायणगाव (दै. संध्या)




दिनांक ११/०१/२०२० रोजी १२:३० वा. ओतूर पोलीस स्टेशन हद्दीतील १७ वर्षे वयाची अल्पवयीन मुलगी त्यांच्या घरापासुन काही अंतरावर असणाऱ्या पाण्याच्या टाकीजवळ कपडे धुण्यासाठी गेली होती. पिडीत मुलगी कपडे धुत असताना आरोपी नामे रमेश सखाराम दाभाडे याने पिडीत मुलीस पाठीमागुन मिठी मारून, तीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करून पिडीत मुलीचा विनयभंग केला होता.

सदरचा प्रकार घडल्यानंतर पिडीत मुलगी घाबरली व तीने तीचे आजोबा यांना आवाज देवून बोलावुन घेतले. पिडीत मुलीचे आजोबा आल्यानंतर तीने त्यांना सर्व घडला प्रकार सांगीतला. त्यानंतर पिडीतचे आजोबा यांनी आरोपी रमेश सखाराम दाभाडे यास घडल्या प्रकाराबाबत जाब विचारला असता त्याने पिडीत मुलीस व तीच्या आजोबास शिवीगाळ दमदाटी करून जिवे मारण्याची धमकी दिली होती.

सदरच्या घडल्या प्रकाराबाबत पिडीत मुलीने दिनांक ११/०१/२०२० रोजी ओतूर पोलीस स्टेशनला तकार दिल्याने आरोपी रमेश सखाराम दाभाडे याचे विरूध्द गु.र.नं. ११/२०२० भा.द.वि.का.क. ३५४ (अ), ५०४, ५०६ सह लैंगीक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधि. २०१२ चे कलम ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. दाखल गुन्हयाचा पुढील तपास ओतूर पोलीस स्टेशनचे तत्कालीन प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक पी.एच.कांबळे यांनी करून यातील आरोपीचे विरोधात सबळ पुरावे प्राप्त करून परिपुर्ण दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केले होते.

गुन्हयाचे दोषारोपत्र दाखल केल्यानंतर सदरच्या गुन्हयाची सुनावणी श्री. एस.बी. शेलार विशेष न्यायाधिश, अतीरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, जुन्नर यांच्यासमोर झाली असुन आरोपीचे विरोधात सबळ पुरावे आढळुन आल्याने मा. न्यायालयाने आरोपी रमेश सखाराम दाभाडे यास दिनांक २५/०६/२०२६ रोजी पोक्सो कायदयाच्या कलम ८ आणि भा.द.वि.का.क. ३५४ (अ) अंतर्गत दोषी धरून ३ वर्ष साधा कारावास आणि १००० रू दंड त्याचप्रमाणे दंड न भरल्यास ६ महीने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल, अप्पर पोलीस अधीक्षक शुभम कुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी जुन्नर विभाग धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे, जिल्हा कोर्ट पैरवी अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष घोळवे, अतिरिक्त सरकारी वकील जी.के. खोडे, कोर्ट पैरवी अधिकारी म.पो.हवा. मनिषा ताम्हाणे, महिला कर्मचारी पुजा औटी यांनी काम केले असुन सदरच्या गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे तसेच पो.हवा. देविदास खेडकर यांनी केला आहे.

मा. कोर्टाने महिनाभरात महीला विरूध्दचे वेगवेगळ्या दोन गुन्हयात शिक्षा दिल्यामुळे समाजामध्ये चांगला संदेश गेला असुन गुन्हेगारामध्ये गुन्हा केल्यानंतर कठोर शिक्षा होते. याबाबत संदेश गेला आहे. त्यामुळे गुन्हा करताना गुन्हेगार दहा वेळा विचार करतील.

# चाकण येथे अप्पर तहसीलदार कार्यालय प्रस्तावित, हरकती व सूचना मागितले

राजगुरुनगर (दै. संध्या)

तालुक्यातील वाढती लोकसंख्या,आणि महसुलावर येणारा ताण पाहता तालुक्यातील नागरिकांना महसुली सेवा अधिक जलद व सुलभपणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनाने प्रशासकीय पुनर्रचनेची प्रक्रिया सुरू केली आहे. या अंतर्गत चाकण येथे स्वतंत्र अप्पर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव पुढे आला असून, त्याबाबत नागरिकांच्या हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. खेड उपविभागीय अधिकारी कार्यालयाने यापूर्वी प्रस्तावित अप्पर तहसीलदार कार्यालयासंदर्भातील सुधारित माहिती व नकाशे शासनाकडे सादर केले होते. त्यानंतर महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी १५ दिवसांची जाहीर सूचना प्रसिद्ध करून नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्याचे आदेश दिले आहेत. खेडचे प्रांताधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांनी यासंदर्भातील जाहीर सूचना प्रसिद्ध केली असून नागरिकांना आपली मते व सूचना लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन केले आहे. प्रस्तावानुसार नव्या चाकण अप्पर तहसीलदार कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात चाकण, आळंदी, पिंपळगाव तर्फे खेड आणि करंजविहीरे या चार मंडलांचा समावेश करण्यात येणार आहे. तर विद्यमान खेड तहसीलदार कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात राजगुरुनगर, वेताळे, कडूस, कन्हेरसर, पाईट, वाडा आणि कुडे बु. ही सात मंडले कायम राहणार आहेत. या पुनर्रचनेमुळे चाकण परिसरातील नागरिकांना महसूल विभागाच्या विविध कामांसाठी राजगुरुनगर येथे येण्याची आवश्यकता कमी होणार आहे.

# गुंजाळवाडीला कॅन्सर सुरक्षा ग्राम योजनेचा शुभारंभ

जुन्नर (दै. संध्या)




न्यु इंडिया एश्योरन्स कंपनीचे विमा प्रतिनिधी राजेंद्र पांडुरंग वाळुंज यांचे माध्यमातून दि .न्यु इंडिया एश्योरन्स कंपनीच्या सहकार्याने गुंजाळवाडी-आर्वी ता.जुन्नर येथे पोर्टल मोबाईल कार्यालयाचे उदघाटन तसेच कॅन्सर सुरक्षा ग्राम योजनेचा प्रारंभ करण्यात आला.

गुंजाळवाडी-आर्वी येथील श्रीराम मंदिरात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अँड.राम कर्पे होते. न्यु इंडिया एश्योरन्स कंपनीचे उप महाप्रबंधक एच. बी. अरुणकुमार, रिजिनल मॅनेजर, प्रेमचंद मोरे ,डिव्हिजनल मॅनेजर शैलेंद्र शिंदे,

सुफी संत सुफीसंत पीर कबीर,लतीफभाई पटेल,जिल्हा परिषद सदस्य नेहा पाटे, एलआयसीचे डोके,भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष विजय पवार, विशाल जुन्नर पतसंसंस्थेचे संचालक दिपक सोनवणे तसेच अनिल शेलार, धनेशशेठ शेलोत, अँड. राजेंद्र बेंडे पाटील, आणि ग्रामस्थ आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

यावेळी गुंजाळवाडी ग्रामस्थांचा मेळावा घेऊन कॅन्सर आजारावर मार्गदर्शन करण्यात आले.

विमा प्रतिनिधी राजेंद्र वाळूंज यांनी प्रास्तविक केले.

प्रेमचंद मोरे यांनी कॅन्सर पॉलीसीचे महत्व व आवश्यक याचे महत्व समजावून दिले. गाव कॅन्सर मुक्त झाल्यास मिळणारे फायदे समजावून सांगितले. नेहा पाटे, विजय पवार यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या दिल्या तसेच राजेद्र वाळुंज यांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. गुरुवर्य लतीफभाई पटेल . अँड.राम कर्पे, एच. बी. अरुणकुमार यांनी मार्गदर्शन केले. धडाडीचे विमा प्रतिनिधी राजेंद्र वाळुंज यांचे कार्य तसेच ह्या उपक्रमाबद्दल कौतुक केले. कार्यकमास गुंजाळवाडी ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजेन्द्र वाळुंज व मित्र परिवार तसेच दि न्यु इंडिया एश्योरन्स कंपनीचे पुणे रिजिनल ऑफिस शैलेंद्र शिदे, कासारवाडी राजगुरूनगर कार्यालय, वाळुंज परिवार व गुंजाळवाडी ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. अँड. स्वप्नील वाळूंज यांनी आभार मानले.

# 'तुम्ही थांबा ना सरकार' लावणीने घातला धुमाकूळ

चाकण (दै. संध्या)



महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख असलेल्या लावणीने नेहमीच प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. याच परंपरेला पुढे नेत, चाकण परिसरातील तरुण दीपक मांडेकर यांनी निर्मिती केलेल्या ' तुम्ही थांबा ना सरकार ' या लावणीने राज्यभर प्रचंड धुमाकूळ घातला आहे. व्यावसायिक पातळीवर अत्यंत उत्कृष्टरित्या चित्रित करण्यात आलेले हे गाणे, प्रेक्षकांना एक वेगळा अनुभव देत आहे.

चाकण परिसरातील दीपक मांडेकर यांनी केवळ निर्मितीच नव्हे, तर लेखन आणि दिग्दर्शनही केले आहे. या लावणीला ओंकार केळकर यांचे संगीत लाभले असून, प्रसिद्ध गायिका सावनी रविंद्र यांनी आपल्या सुमधुर आवाजात हे गाणे गायले आहे. निखिल पडवळ यांनी सिनेमॅटोग्राफीची धुरा सांभाळली आहे. तर अविनाश नलावडे यांनी नृत्य दिग्दर्शन केले आहे. प्रतिभा जोशी आणि विश्वास पाटील यांनी या लावणीत प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. ज्यामुळे गाण्याला एक वेगळी उंची प्राप्त झाली आहे. सोशल मीडियावर आणि विविध माध्यमांवर या लावणीची जोरदार चर्चा सुरू आहे. प्रेक्षकांकडून या गाण्याला भरभरून दाद मिळत असून, ते राज्यभरातील सांस्कृतिक कार्यक्रमांमध्येही आकर्षणाचे केंद्र बनले आहे. गाण्याचे व्यावसायिक सादरीकरण आणि कलाकारांचा दमदार अभिनय यामुळे हे गाणे अल्पावधीतच लोकप्रिय झाले आहे. दीपक मांडेकर हे स्वतः निर्माता, लेखक व दिग्दर्शक आहेत. गायन सावनी रविंद्र यांनी, संगीत ओंकार केळकर यांचे आहे. सिनेमॅटोग्राफी निखिल पडवळ यांची तर नृत्य दिग्दर्शन अविनाश नलावडे यांचे आहे. प्रमुख भूमिकेत प्रतिभा जोशी, विश्वास पाटील, दीपक मांडेकर आहेत. कलेचा वारसा आणि ध्यास मॉडेल व्हिलेज आंबेठाण गावचे रहिवासी असलेले दीपक मांडेकर हे एका सांस्कृतिक परंपरेतून आलेले आहेत. त्यांच्या कुटुंबाचा कलेचा वारसा ते अत्यंत चांगल्या पद्धतीने पुढे चालवत आहेत.

# रुग्णसेवेला समर्पित व्यक्तिमत्त्व बारामतीतील अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. गोकुळ काळे

बारामती (दै. संध्या)

बारामती शहरातील आरोग्यसेवेत अस्थिरोग उपचाराच्या क्षेत्रात विश्वासार्ह नाव म्हणून डॉ. गोकूळ काळे यांची ओळख निर्माण झाली आहे. आधुनिक वैद्यकीय ज्ञान, अद्ययावत उपचारपद्धती आणि रुग्णांप्रति असलेली संवेदनशीलता यांच्या बळावर त्यांनी अनेक रुग्णांना नवसंजीवनी दिली आहे. हाडे, सांधे, स्नायू आणि मणक्यांशी संबंधित विविध आजारांचे अचूक निदान करून योग्य उपचार देणे, ही त्यांची खासियत मानली जाते. अपघातामुळे झालेल्या फ्रॅक्चरपासून गुडघेदुखी, कंबरदुखी, खांदेदुखी, सांध्यांची झीज, क्रीडाजन्य दुखापती, तसेच ज्येष्ठ नागरिकांमधील अस्थिविकारांवर ते प्रभावी उपचार करतात. आवश्यकतेनुसार शस्त्रक्रिया आणि शस्त्रक्रियेशिवाय उपचार या दोन्ही पर्यायांचा संतुलित वापर करून रुग्णाला लवकरात लवकर पूर्ववत जीवन जगता यावे, यासाठी ते प्रयत्नशील असतात. रुग्णाशी सविस्तर संवाद साधून त्याच्या आजाराचे स्वरूप समजावून सांगणे, योग्य मार्गदर्शन करणे आणि उपचारांबरोबरच व्यायाम, फिजिओथेरपी व जीवनशैलीतील आवश्यक बदलांवर भर देणे, ही डॉ. गोकूळ काळे यांच्या उपचारपद्धतीची वैशिष्ट्ये आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### सुभद्राबाई मुंगसे यांचे निधन



चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील रासे येथील जुन्या पिढीतील महिला कार्यकर्त्या सुभद्राबाई गुलाबराव मुंगसे (वय - ८६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे मुले, मुली, सुना, नातवंडे, दिर, पुतणे, भाऊ असा परिवार आहे. आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते सूर्यकांत मुंगसे यांच्या त्या मातोश्री, आदर्श शिक्षिका सुनीता मुंगसे यांच्या सासू, तर डॉ. मृदुला मुंगसे यांच्या त्या आजी होत. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली असून, सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# विमानतळ पिटाळून लावले, रेल्वे घालवली

## चाकणकरांचा वाहतूक कोंडीने गुदमरतोय श्वास

चाकण (दै. संध्या)




शेतकरी उध्वस्त होईल या नादात विमानतळ पिटाळून लावले, त्यानंतर रेल्वे घालवली, विकास कामांचा बट्ट्याबोळ होत असताना चाकणकरांचा वाहतूक कोंडीने मात्र श्वास गुदमरू लागला आहे.

कांदा बटाट्याचे प्रसिद्ध मार्केट असलेल्या चाकण मधील परिस्थिती दिवसेंदिवस अत्यंत गंभीर होत चालली असून, वाढत्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक अक्षरशः मरणयातना सहन करत आहेत. चाकण हे आता शहर राहिले नसून एक आंतरराष्ट्रीय औद्योगिक केंद्र झाले आहे. प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे चाकण परिसरातील पायाभूत सुविधा आणि वाहतूक नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. चाकण मधील वाहतूक कोंडी ही केवळ गैरसोय नसून ती आता नरकयातना झाली आहे. चाकण मध्ये

रस्त्याच्या दुतर्फा असलेली अनधिकृत दुकाने आणि टपऱ्यांमुळे रस्ते अरुंद झाले आहेत. नियोजनशून्य पार्किंग बनले आहे. अवजड वाहने, ट्रक, कंटेनर रस्त्याच्या कडेलाच उभी केली जात आहेत. यामुळे खऱ्या अर्थाने शहरात वाहतुकीला अडथळा होतो.

अरुंद रस्ते आणि उड्डाणपुल असून नसल्यासारखे आहेत. वाढत्या वाहनांच्या तुलनेत रस्त्यांचे रुंदीकरणही रखडलेले आहे. विरुद्ध दिशेने येणारी वाहने आणि सिग्नल यंत्रणेचा अभाव आहे.

प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत. चाकण नगरपरिषदेने पोलिसांच्या मदतीने जुन्या पुणे नाशिक रस्त्यावरील चाकण हद्दीतील अतिक्रमणे कायमस्वरूपी हटविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. नो पार्किंग झोनची कडक अंमलबजावणी करून चाकण मधील मुख्य चौकात आणि रस्त्यांवर उभ्या राहणाऱ्या जड वाहनांवर जप्तीची कारवाई होणे अपेक्षित आहे. नगरपरिषदेने स्वतःचे ट्रॅफिक वॉर्डन्स नेमून पोलिसांना मदत करणे आवश्यक आहे. औद्योगिक वसाहतीत ट्रकसाठी शहराबाहेर हक्काच्या पार्किंगची सोय करण्याची गरज आहे. मात्र यावर तोडगा निघत नसल्याचा आरोप सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे.

दैनिक संध्या नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
संध्या LIVE आवाज महाराष्ट्राचा...
दै. संध्या व संध्या लाईव्ह चॅनलसाठी
संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार नेमणे आहे.
आपणही बना आमच्या टीमचा भाग !
पात्रता : मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक. पत्रकारितेचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य
कामाचे स्वरूप : बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.
आम्ही देतो : ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.
कार्यक्षेत्र : संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)
तुमची लेखणी... तुमचा आवाज... महाराष्ट्राचा विश्वास!
विश्वसनीय वृत्तांकन | व्यापक वाचकवर्ग | निर्भीड व सकारात्मक | प्रत्येक घडामोडीवर अचूक नजर
महाराष्ट्राच्या प्रत्येक कोपऱ्यातील बातमी आमच्यापर्यंत पोहोचवा...
आपली ओळख करा... आपला आवाज बुलंद करा!
संपर्क : 9881748749
आजच संपर्क साधा आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!